



RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १६८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २९ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांचा धर्म पाहून दु:खी होऊ नका अमित शाहांनी अखिलेश यादवांना सुनावले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९नवी दिल्ली**

संसदेत ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेत गृहमंत्री अमित शाह यांनी पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांना ठार मारल्याची माहिती दिली. ऑपरेशन महादेवद्वारे तिन्ही दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात आल्याचे अमित शाह म्हणाले. श्रीनगरमधील दाचीगाम चकमकीत सुलेमान शाह उर्फ हाशिम मुसा आणि जिब्रान आणि अफगाणी या दहशवाद्यांना ठार करण्यात आलं. संसदेत अमित शाह माहिती देत असताना समाजावादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांच्यासोबत त्यांच्या बाचाबाची झाली.



दहशतवाद्यांचा धर्म पाहून तुम्ही दु:खी होऊ नका अशा शब्दात अमित शाह यांनी अखिलेश यादव यांना सुनावले. पाकिस्तानशी तुमचं बोलणं होतं का असाही सवाल अमित शाह यांनी केला.

जेव्हा अमित शाह ऑपरेशन महादेवची माहिती देत होते, तेव्हा अखिलेश यादव यांच्यासह संपूर्ण विरोधकांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. पंतप्रधान मोदीनी 'ऑपरेशन सिंदूर' द्वारे दहशवाद्यांना पाठवणाऱ्यांनाही मारले आणि आपल्या सुरक्षा दलांनी पाठवलेल्यांनाही मारले असं म्हणताच अखिलेश यादव यांनी पाकिस्तान दहशतवाद्यांचा आका आहे असं म्हटलं. त्यानंतर अमित शाह यांनी विचारलं की तुमच पाकिस्तानशी बोलणं होतं का असं म्हटलं. यावर अखिलेश यादव उभे राहिले. त्यानंतर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी यादव यांना त्यांना बसण्यास सांगितले.

मला अपेक्षा होती की जेव्हा विरोधकांना दहशतवाद्यांच्या मृत्युची बातमी कळेल तेव्हा विरोधी पक्षात आनंदाची लाट येईल, पण त्यांचे चेहरे दु:खाने भरलेले होते. त्यांना दहशतवाद्यांना मारल्याचा आनंदही नाही, असंही अमित शाह म्हणाले. त्यानंतर अखिलेश यादव यांना उद्देशून अमित शाह यांनी दहशतवाद्यांचा धर्म पाहून दु:खी होऊ नका, असं म्हटलं.

काल तुम्ही विचारत होता की दहशतवादी कुठून आले. जबाबदारी आमची आहे, आम्ही सरकारमध्ये आहोत. पण मला विचारायचे आहे की तुम्ही सरकारमध्ये असताना जबाबदारी का घेतली नाही. काल देशाचे माजी गृहमंत्री चिदंबरम म्हणाले की दहशतवादी पाकिस्तानातून आले याचा पुरावा काय आहे, संसदेत चर्चा होणार असताना तुम्ही हे कधी उपस्थित केले. चिदंबरमसाहेब तुम्हाला काय म्हणायचे आहे, पाकिस्तानला वाचवून तुम्हाला काय मिळेल?, असाही सवाल अमित शाह यांनी केला.

## २६/११ चा उल्लेख करत प्रियंका गांधींचे अमित शाहांवर जोरदार टीकास्त्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९नवी दिल्ली**

देशात युद्ध सुरू होण्याआधीच संपले, हे युद्ध संपवण्याची भाषा आपलं सैन्य करत नाही. सरकार करत नाही तर अमेरिकेत बसून डोनाल्ड ट्रम्प यांनी केले. हे आपल्या पंतप्रधानांचे अपयश आहे. ११ वर्षापासून तुम्ही सत्तेत आहात. पहलगाम हल्ल्याची जबाबदारी कोण घेणार? युद्धविराम का झाला याचे उत्तर दिले जात नाही. ऑपरेशन सिंदूर असेल तर त्याचे श्रेय घेण्याचे काम पंतप्रधान मोदी करतात परंतु हल्ल्याची जबाबदारी कोणच घेत नाही असं सांगत काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर थेट निशाणा साधला.



खासदार प्रियंका गांधी म्हणाल्या की, पहलगाम हल्ल्यानंतर लष्करप्रमुखांनी, गुप्तचर प्रमुखांनी राजीनामा दिला का? गृहमंत्र्यांनी राजीनामा दिला का? राजीनामा तर सोडाच, त्यांनी जबाबदारीही घेतली नाही. तुम्ही इतिहासाबद्दल बोलला, मी वर्तमानाबद्दल बोलेन. तुम्ही ११ वर्षे सत्तेत आहात, जबाबदारी घ्यायला हवी. काल मी पाहत होते, गौरव गोगोई यांनी जबाबदारीबद्दल बोलताना राजनाथ सिंह मान हलवत होते, पण गृहमंत्री अमित शाह हसत होते. मुंबई हल्ल्यानंतर मनमोहन सरकारने काहीही केले नाही असं सत्ताधारी पक्ष सांगतात पण ती घटना सुरू असताना त्या दहशतवाद्यांना तिथेच मारले. एक वाचला ज्याला नंतर पकडण्यात आले आणि २०१२ मध्ये त्यालाही फाशी देण्यात आली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि देशाचे गृहमंत्री नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला. उरी-पुलवामाच्या वेळी राजनाथ सिंह गृहमंत्री होते, आज ते संरक्षणमंत्री आहेत. अमित शाहांच्या काळात मणिपूर जळत आहे, दिल्लीत दंगली झाल्या, पहलगाम घडले आणि आजही ते गृहमंत्री आहेत असं सांगत त्यांनी शाह यांच्या राजीनाम्यावर भाष्य केले.

## ऑपरेशन महादेव: पहलगाम हल्ल्यातील तीनही दहशतवाद्यांची 'कुंडली' समोर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९जम्मू काश्मीर**

जम्मू-काश्मीरमधील ऑपरेशन महादेवमध्ये ठार झालेल्या तिन्ही दहशतवाद्यांची संपूर्ण 'कुंडली' आता समोर आली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिलेल्या माहितीनुसार, या कारवाईत सुलेमानी, अफगान आणि जिब्रान या तीन दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले. भारतीय लष्कर, केंद्रीय सुरक्षा दल आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी संयुक्तपणे केलेल्या या ऑपरेशनमध्ये त्यांना ठार करण्यात आले.संसदेत सुरू असलेल्या चर्चेदरम्यान अमित शाह यांनी सांगितलं की, या दहशतवाद्यांकडून ज्या गोळ्या मिळाल्या आहेत, त्याच गोळ्यांचा वापर पहलगाममध्ये निष्पाप लोकांना मारण्यासाठी करण्यात आला होता.



सुलेमान: पहलगाम हल्ल्याचा मास्टरमाइंड असलेला सुलेमान हा पाकिस्तानी वंशाचा होता. लष्कर-ए-तैयबामध्ये सामील होण्यापूर्वी सुलेमान पाकिस्तानी सैन्यात कमांडर होता. त्याला पहलगाम हल्ल्यापूर्वी पीओकेमध्ये (पाकव्याप्त काश्मीरमध्ये) प्रशिक्षण देण्यात आले होते. सुलेमान २०२२पासून जम्मू-काश्मीरमध्ये सक्रिय होता.

जिब्रान: जिब्रान हा लष्कर-ए-तैयबाचा 'ए-ग्रेड'चा कमांडर होता. पाकिस्तानी वंशाचा जिब्रान जम्मू-काश्मीरमधील अनेक दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी होता. गेल्या वर्षी सोनमर्ग येथे झालेल्या घटनेची जबाबदारीही जिब्रानने स्वीकारली होती.

अफगान: अफगान नावाचा दहशतवादीही पाकिस्तानचाच रहिवासी होता. अफगानही लष्कर-ए-तैयबाचा 'ए-श्रेणी'चा कमांडर होता. अफगाननेही पहलगाममध्ये लोकांवर गोळ्या झाडल्या होत्या. आरोप आहे की यानंतर अफगानने इतर साथीदारांसोबत तिथे जश्नही साजरा केला होता.

**तिघांना कसे घेरले?**

अमित शाह यांच्या मते, ज्या दिवशी कॅबिनेट कमिटी ऑफ सिक्युरिटीची (उउड) बैठक होती, त्याच दिवशी या तिन्ही दहशतवाद्यांना बाहेर पडू द्यायचे नाही, असा निर्णय झाला होता. त्यानंतर लष्कराने तातडीने घेराबंदी सुरू केली.

लष्कर, सीआरपीएफ आणि जम्मू-काश्मीर पोलिसांनी आधी या तिघांचे ठिकाण शोधले आणि त्यानंतर तिघांविरोधात ऑपरेशन सुरू केले. पावसामुळे हे दहशतवादी जास्त वेळ टिकू शकले नाहीत. तिन्ही दहशतवादी लष्कराच्या ऑपरेशनमध्ये मारले गेले. तिघांच्या जवळून पाकिस्तानी चॉकलेट्स आणि शस्त्रे सापडली आहेत.

## राज्य सरकार १० जिल्ह्यात 'उमेद मॉल' उभारणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यामध्ये, उमेद मॉल उभारण्यात येणार असल्याचा निर्णय राज्याच्या ग्राम विकास मंत्रालयाच्यावतीने घेण्यात आला आहे. प्राथमिक तत्त्वावर राज्यातील १० जिल्ह्यात उमेद मॉल उभारण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती



अभियानांतर्गत १० जिल्ह्यात 'उमेद मॉल' (जिल्हा विक्री केंद्र) ची उभारणी केली जाणार असून महिला बचत गटाने तयार केलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचं काम या उमेद मॉलच्या माध्यमातून होणार आहे.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत आज ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले, त्यामध्ये ग्राम विकास विभाग २, सहकार पणन १, विधि व न्याय विभागाचे २, महसूल १ आणि जलसंपदा विभागाच्यावतीने २ निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, उमेद मॉलची उभारणी करुन १० जिल्ह्यातील बचत गटांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २० मिनिटे मंत्र्यांचा क्लास घेतला. वादग्रस्त विधाने, कृती अजिबात खपवून घेतली जाणार नाही, असेच प्रकार होत राहिले तर सरकारची प्रचंड बदनामी होते. ही अखेरची संधी, काय कारवाई करायची ती करुच, पण आता एकही प्रकार खपवून घेणार नाही, अशी तंबीच मुख्यमंत्र्यांनी सर्व मंत्र्यांना दिली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचंड नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे.

## ...यापुढे एकही चूक खपवून घेणार नाही मुख्यमंत्री फडणवीसांनी मंत्र्यांना दिली तंबी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई**

'यापुढे एकही चूकीचा प्रकार खपवून घेणार नाही', असं म्हणत मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्र्यांना चांगलीच तंबी दिली. राज्यातील मंत्र्यांच्या वादग्रस्त विधान आणि कृतीमुळे गेल्या काही दिवसांपासून सरकारची बदनामी होत आहे. या सर्व घटनानंतर आज मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सर्व मंत्र्यांची चांगलीच शाळा घेतली. २० मिनिटं त्यांनी या मंत्र्यांचा क्लास घेतला आणि आता एकही चूक खपवून घेणार नाही, असं त्यांनी मंत्र्यांना स्पष्टपणे सांगितले.



मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज तब्बल २० मिनिटं सगळ्या मंत्र्यांचा क्लास घेतला. 'वादग्रस्त विधाने, वादग्रस्त कृती अजिबात खपवून घेतली जाणार नाही. असेच प्रकार होत राहिले तर सरकारची प्रचंड बदनामी होते. ही अखेरची संधी, काय कारवाई करायची ती करूच. आता एकही प्रकार खपवून घेणार नाही.' असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी वादग्रस्त विधान करणाऱ्या मंत्र्यांना सज्जड दम दिला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी यासंदर्भात तीव्र नाराजी व्यक्त केली.

आज राज्य मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये अनेक महत्वाचे निर्णय घेण्यात आले. या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये कृषी, ग्रामविकास, विधी व न्याय विभागाअंतर्गत वेगवेगळ्या तरतुदी करण्यात आल्या. ही महत्वपूर्ण बैठक संपल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी मंत्र्यांना सज्जड दम दिला. यापुढे कुठलेही वक्तव्य, कृती खपवून घेतल्या जाणार नाही असे त्यांनी मंत्र्यांना सांगितले. त्याचसोबत त्यांनी जे चूका करतात त्यांच्याविरोधात कारवाई केली जाईल असे देखील सांगितले.

## श्रावणात रंगणार ऊन-पावसाचा खेळ; पावसाची १५ दिवस सुट्टी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अमरावती**

पावसाळी हंगाम मध्यवर्ती आला असताना मान्सून बाबत एक चिंता वाढवणारी बातमी हाती आलीय.मान्सूनच्या मध्यपर्यंत वरुणराज भारतात धो-धो बरसला. परंतु आता वरुणराजा १५ दिवसांच्या सुट्टीवर जाणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवलाय. पुढील तीन दिवस कोकण आणि विदर्भातील काही भागात जोरदार पावसाचा अंदाज आहे. तर इतर भागात पावसाची उघडीप राहणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिलाय.

दरम्यान, हवामान विभागानुसार,भारतात सामन्या पेक्षा ८ टक्के जास्त पाऊस झालाय. खरीप पिकांसाठी हे चांगलं आहे. एक जुलै ते २८ जुलैदरम्यान देशात साधारण ४४०.१ मिमी पाऊस झालाय. देशातील सर्व भागात चांगला पाऊस झालाय. याचदरम्यान हवामान विभागाने मान्सून बाबत नवी अपडेट दिलीय. आठवडाभरापासून मुंबईसह संपूर्ण कोकण किनारपट्टीला पावसाने झोडपून काढणारा पाऊस सुट्टीवर जाणार आहे. हवामान बदलामुळे पाऊस मोठ्या सुट्टीवर जाणार आहे.

वाऱ्याची दिशा, गती आणि समुद्रातील हवामान बदलामुळे पाऊस १५ ऑगस्टनंतरच जोरदार पाऊस होईल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवलाय. संपर्ण राज्यभरात अशीच स्थिती राहणार आहे. मात्र ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या पंधरवाड्यात विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता आहे. काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा पडणारा पाऊस ढगांच्या गडगडाटासह आणि विजांच्या कडकडटात पडत असतो, असं हवामान अभ्यासक अश्रेय शेट्टी यांनी सांगितलंय.

## कलंकित मंत्र्यांचा राजीनामा न घेणाऱ्या सरकारने गोमूत्र शिंपडून त्यांना पवित्र करून घ्यावे - विजय वडेट्टीवार यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९मुंबई**

राज्याचे कृषिमंत्री शेतकऱ्यांविरोधात विधान करतात, विधी मंडळात कामकाज सुरू असताना रम्मीचा गेम खेळतात आणि सरकार बेजबाबदार मंत्र्यांचा राजीनामा घेत नाही, कृषिमंत्री कोकाटे यांचा राजीनामा न घेणे म्हणजे सरकार शेतकऱ्यांच्याप्रती असंनवेदनशील असल्याचे स्पष्ट झाले, अशी टीका काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.



मुंबईत पत्रकार परिषदेला संबोधित करताना वडेट्टीवार म्हणाले, राज्याचे गृहराज्यमंत्री डान्सबार चालवतात, एका मंत्र्यांकडे पैश्याचा बॅगा सापडतात पण तरीही यांची पाठराखण जर करण्यात येत असेल तर या सर्व मंत्र्यांवर गोमूत्र शिंपडून त्यांना पवित्र करून घ्यावे. लाडकी बहिण म्हणायचे आणि बारमध्ये बहिणींना नाचवायचे असा किळसवाणा प्रकार महाराष्ट्राच्या राजकारणात कधी झाला नव्हता, अशी टीका विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी केली. नागपूर मधील बार मध्ये अधिकारी फाईली घेऊन बसतात, गडचिरोलीचे ते अधिकारी असल्याची माहिती समोर येते. गडचिरोलीचे पालकमंत्री मुख्यमंत्री आहेत, असा कारभार सुरू असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.एकीकडे शेतकरी आत्महत्या करत आहे, कंत्राटदार आत्महत्या करत आहे बिल थकली आहेत. राज्यातील शेतकऱ्यांची बँकाकडे ३५ हजार कोटींची थकबाकी आहे. शेतकरी आता कर्ज घेऊ शकणार नाही, शेतकरी अडचणीत आला आहे पण सरकारला त्याचे देणेघेणे नाही.शक्तिपीठ महामार्गाला शेतकरी विरोध करत आहे, तरी त्या महामार्गासाठी सरकार पैसे द्यायला तयार आहे पण शेतकरी कर्जमाफी मागत आहे त्यासाठी सरकार तयार नाही, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

## पोलीस अधिकाऱ्यांनी घेतली ऑटो चालक मालकांची बैठक

### सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताकच्या बातमीची दखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९ अंजनगाव सुर्जी**

स्थानिक पोलीस स्टेशनमध्ये पोलीस अधिकाऱ्यांनी ऑटो चालक व मालकांची एक बेठक आज दिनांक २८ जुलै रोजी आयोजित केली होती.अंजनगाव बस स्थानकावर ऑटो चालकांचा सुरू असलेला मनमानी कारभार, पोलिसांशी हुज्जत हे सर्व प्रकार सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक ने सोमवारच्या अंकात सविस्तर पणे प्रकाशित केले होते. या बातमीची दखल घेत प्रभारी ठाणेदार सुरज तेलगोटे यांनी आह २८ जुलै रोजी सायंकाळच्या


विदर्भ प्रजासत्ताक

अंजनगाव बसस्थानक परिसरात ऑटोचालकांची मुजोरी वाढली

दरम्यान सर्व ऑटो चालक व मालकांची एक मीटिंग अंजनगाव



पोलीस स्टेशन मध्ये आयोजित करण्यात आली होती.

या मीटिंगमध्ये प्रवासी वाहतूक करणाऱ्या ऑटो चालक-मालक यांच्या सर्व समस्या अधिकाऱ्यांनी ऐकून घेतल्या नंतर प्रवासी ऑटो चालक मालकांना प्रभावी ठाणेदार सुरेश तेलगोटे यांनी सांगितले की, सर्व ऑटो चालक यांना वाहतुकीचे नियम पालन करावेच लागणार आहे त्याचप्रमाणे एसटी बस स्टँड च्या आत प्रवासी भरण्याकरिता ऑटो न नेणे, आरटीओ संबंधित सर्व कागदपत्र सोबत बाळगावे, नंबर प्रमाणे सिंगल लाईन मध्ये ऑटो लावणे, पार्किंग मध्ये ऑटो लावणे, आऊट डेटेट ऑटो न चालवणे अशा महत्त्वपूर्ण सूचना ऑटोचालकांच्या मीटिंगमध्ये पोलीस अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्या. त्याचप्रमाणे नवीन व जुन्या बस स्टँड परिसरात ट्राफिक कर्मचारी सतत नेमून नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येत असल्याचे प्रभारी ठाणेदार सुरज तेलगोटे यांनी सांगितले.सदर सभेला मोठ्या संख्येने ऑटो चालक- मालक उपस्थित होते.

## संपादकीय ......

# राजस वन्यसम्राटाच्या संवर्धनासाठी...

*दरवर्षीप्रमाणे यंदाही २९ जुलै रोजी जागतिक व्याघ्र दिन जगभरात साजरा होत आहे. वाघ हा जैवसाखळीतील महत्त्वाचा वन्यपशू आहे. भारताच्या विविध प्राचीन ग्रंथांत, लोककथांमध्ये आणि कलाविष्कारांमध्ये वाघ हा शक्ती, निर्भयता आणि राजस सौंदर्याचे प्रतीक म्हणून समोर आला आहे. व्याघ्र दिनानित्ताने वाघाच्या संवर्धनासाठी सर्वसमावेशक कृती व्हायला हवी.*

*एकेकाळी संपूर्ण आशियात मुक्तपणे फिरणार्या या शाही प्राण्याची संख्या एका शतकात एक लाखावरून थेट ३५०० पर्यंत खाली आली होती. हीच गंभीर परिस्थिती ओळखून २०१० मध्ये रशियात सेंट पीटर्सबर्ग येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय वाघ परिषदेत 'टीएक्स-२' हा संकल्प करण्यात आला. म्हणजे २०२२ पर्यंत वन्य वाघांची संख्या दुप्पट करायची! १३ वाघ-निवास देशांनी एकत्र येऊन वाघाच्या संवर्धनासाठी बहुपक्षीय कार्यक्रम आखला. या घोषणेनंतर भारत, नेपाळ, भूतान, रशिया, मलेशिया, थायलंड अशा देशांनी स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध धोरणात्मक पावले उचलली. भारताने 'प्रोजेक्ट टायगर'अंतर्गत १९७३ पासूनच सुरू केलेली वाटचाल अधिक गतिमान केली. आज, २०२५ मध्ये आपण त्या संकल्पाचे फळ पाहात आहोत. जागतिक अहवालानुसार आज आशियामध्ये सुमारे ५,५७४ वन्य वाघ आहेत, जे २०१० च्या तुलनेत सुमारे ७४ टक्के अधिक आहेत.*

*भारतात सध्या ५३ व्याघ्र प्रकल्पांमध्ये वाघांच्या निवासासाठी संरक्षित क्षेत्रांचे जाळे विस्तारले आहे. यात मध्य प्रदेशातील कान्हा आणि पेंच, महाराष्ट्रातील ताडोबा, पश्चिम बंगालमधील सुंदरबन, उत्तराखंडमधील कॉर्बेट अशा विविध भौगोलिक आणि परिस्थितिकीय भागांचा समावेश आहे. यामुळेच आजघडीला भारतामध्ये सर्वाधिक म्हणजे ३,६८२ वाघ हयात स्थितीत आहेत.*

*'प्रोजेक्ट टायगर'पासून सुरू झालेल्या आपल्या संरक्षण यशोगाथेत आता आधुनिक पद्धतींचा वापर, कॅमेरा ट्रॅप्स, बायो फेन्सिंग आणि स्थानिक समुदायांचा सहभाग हे नवे आयाम जोडले गेले आहेत. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, कर्नाटक, उत्तराखंड अशा अनेक राज्यांत संरक्षण क्षेत्रे वाढवण्यात आली आहेत. पण याचवेळी चिंतेची बाब म्हणजे झारखंड, ओडिशा आणि छत्तीसगडसारख्या राज्यांत चितळ, सांबर, रानगवा यांसारख्या वाघाचे खाद्य असणार्या प्राण्यांच्या प्रजातींची संख्या घटत चालली आहे. त्यामुळे वाघ मानवी वस्त्यांकडे वळू लागलेत आणि माणूस-वाघ संघर्षाचे प्रमाण वाढते आहे. भारतीय वन्यजीव संस्था (डब्ल्यूआयआय) आणि राष्ट्रीय वाघ संरक्षण प्राधिकरण (एनटीसीए) यांनी संयुक्तपणे प्रसिद्ध केलेल्या एका नव्या अहवालात यासंदर्भात गंभीर इशारा देण्यात आला आहे.*

*वाघांचे खाद्य असणार्या या प्रजातींच्या संख्येत घट होण्यामागे जंगलतोड, पायाभूत सुविधा विकास, शेतीचा विस्तार, शिकारी आणि काही भागांतील नागरी अस्थिरता यांसारखी अनेक कारणे आहेत. जागतिक व्याघ्रसंख्येतील सुमारे ७० टक्के वाघ भारतात आहेत. त्यांच्या आहारात नीलगाय, जंगली डुक्कर, हॉग डिअर, बार्किंग डिअर आणि चिंकारा यांसारख्या इतर प्रजातीही असतात. फक्त वाघच नाही; तर बिबट्या, कोल्हा आणि लांडगा यांसारखे इतर शिकारी प्राणीही याच शिकार प्रजातींवर अवलंबून असतात. एक महत्त्वाची गोष्ट सर्वांनीच लक्ष घ्यायला हवी, ती म्हणजे वाघाचे अस्तित्व हे त्या जंगलाच्या आरोग्याचे निदर्शक मानले जाते. जिथे वाघ आहेत, तिथे चांगली शिकार प्रजाती, निरोगी जैवसाखळी, वने आणि जलप्रणाली आहेत, असे मानले जाते. त्यामुळे व्याघ्रसंवर्धन म्हणजे संपूर्ण परिसंस्थेचे रक्षण होय. तसेच वाघाच्या अस्तित्वाशी थेट संबंधित असणारे बिबट्या, लांडगा, कोल्हा यांसारखे अन्य शिकारी प्राणी याच परिसंस्थेतील घटक आहेत. त्यांचं संतुलन टिकवणं हीसुद्धा एक व्यापक पर्यावरणीय जबाबदारी आहे.*

# संशोधनाला प्रोत्साहन: देश आणि समाजाच्या विकासासाठी गुणवत्तापूर्ण संशोधन आवश्यक

## अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बारहाते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती-**

अमरावती विद्यापीठात पाच दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी संशोधकांना देश आणि समाजाच्या फायद्यासाठी संशोधन करण्याचे आवाहन केले.



प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत विद्यापीठातील युजीसी-मालवीय मिशन टिचर्स ट्रेनिंग सेंटर आणि गृहविज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. बारहाते होते.डॉ. बारहाते म्हणाले की संशोधन हे देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. देशाचा विकास हा संशोधनाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. अमेरिकेसह इतर देशांनी गुणवत्तापूर्ण संशोधन केल्यामुळे त्यांचा विकास अधिक झाला आहे. भारत संख्यात्मक संशोधनामध्ये पुढे असला तरी गुणवत्तापूर्ण संशोधनामध्ये मागे आहे.

आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे यांनी विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रात उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की येथे अनेक डाटा जर्नल्स, डाटा बेस, ई-बुक्स, रिपोझिटरी आदी सुविधा उपलब्ध आहेत. ई-शोधसिंधू, शोधगंगा, शोधचक्र आणि महिला संशोधकांसाठी 'शेरनी' अशा सुविधा संशोधकांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत.गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांनी कार्यशाळेमागील उद्देश स्पष्ट केले. या कार्यशाळेसाठी साठ संशोधक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून हॅन्ड्स ऑन सेशनही आयोजित केले जाणार आहे.

कार्यक्रमाला सिम्बॉसिस सेंटर फॉर रिसर्च अँड इनोव्हेशन, पुणेच्या माजी संचालक डॉ. रुचिका कौल घाणेकर यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे प्रमुख, शिक्षक आणि संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन अनुश्री आडे यांनी केले तर आभार डॉ. दीपाली भैसे यांनी मानले.

# शेतकऱ्यावर अस्वलाचा हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती,**चिखलदरा तालुक्यातील बामादेही शिवारात गुरे चारत असलेल्या शेतकऱ्यावर अस्वलाने हल्लाकेल्याची धक्कादायक घटना आज २८ जुलै रोजी दुपारी घडली. या हल्ल्यात पुनाजी धिकार हे शेतकरी गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर सध्या इर्विन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुनाजी धिकार हे बामादेही गावातील रहिवासी असून नेहमीप्रमाणे दुपारी गुरे चारण्यासाठी गावालगतच्या जंगलात गेले होते.

माहितीनुसार, पुनाजी हे जंगलात गुरे चराई करित असताना अचानक एका अस्वलाने त्यांच्यावर हल्ला केला. अस्वलाने त्यांना शरीराच्या विविध भागांवर तोंड व नख्यांनी गंभीर जखमा केल्या.ग्रामस्थांनी धाव घेऊन तात्काळ त्यांना चुर्णी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. तेथे डॉ. पंकज पायधन आणि त्यांच्या वैद्यकीय पथकाने प्राथमिक उपचार केले. प्रकृतीची गंभीरता लक्षात घेता पुनाजी यांना तातडीने अमरावतीतइर्विन रुग्णालय




रूग्णालयात रेफर करण्यात आले. ही घटना उघडकीस आल्यानंतर बामादेहीसह आसपासच्या आदिवासी गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही काळात शेतकऱ्यावर आणि नागरिकांवर हिंस्त्र वन्य प्राण्यांचे हल्ले वाढले असल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना पसरली आहे.या घटनेनंतर स्थानिक नागरिक आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी वन विभाग व जिल्हा प्रशासनाकडे तात्काळ उपाययोजनांची मागणी केली आहे. बामादेही परिसरात वन्य प्राण्यांची वाढती दहशत लक्षात घेता गस्त वाढवावी, पिंजरे लावावेत, तसेच शेतकऱ्यांना व पशुपालकांना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# बिंज ईटिंग म्हणजे काय?

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक**

बिंज ईटिंग म्हणजेच एका बैठकीत खूप अन्न खाण्याची प्रवृत्ती. ही सवय शारीरिक भुकेपेक्षा मनाच्या ताणाशी जास्त जोडलेली आहे. एखाद्या सणावाराच्या दिवशी जास्त खाणे म्हणजे बिंज ईटिंग नव्हे.



नियमित स्वरूपात भावनिक उद्देशाने भूक नसतानाही आहाराचे सेवन केले जात असेल आणि त्यानंतर अपराधीपणा, लाज, नियंत्रण गमावल्याची भावना जाणवत असेल, तर सदर व्यक्तीला बिंज ईटिंगची समस्या जडली आहे, असे समजावे.

काही लोक परिपूर्ण जेवण केल्यानंतरही पुन्हा काहीतरी खाण्याकडे वळतात. ही भूक शरीराची नसून मनाची असते. तणाव, दु:ख, अपयश, हतबलता किंवा परिणाम दिसत नसल्याने होणारी निराशा ही बिंज ईटिंगमागील प्रमुख कारणं असतात. यावेळी डोपामिन (आनंद निर्माण करणारं मेंदूतील रसायन) तत्काळ हवं असतं आणि ते मिळवण्यासाठी साखरयुक्त, तेलकट, चविष्ट अन्न खावंसं वाटतं; पण त्यानंतर येणारा अपराधीपणा हा आत्मविश्वास कमी करण्यास कारणीभूत ठरतो. भावनिक चढउतारांच्या काळात किंवा नकारात्मक अवस्थेत हे वर्तन अधिक होते. कारण, या मनोवस्थेत आत्मनियंत्रण हरवलेलं असतं. अशा वेळी अन्न हे कोपिंग मेकॅनिझम किंवा भावनिक सांत्वन करणारं साधन ठरतं; पण हेच अन्न पुढे शरीरासाठी नुकसानकारक ठरू शकतं. यावरून वजन कमी करणं म्हणजे फक्त बाह्य बदल नाही, तर अंतर्मनातील आणि शरीरातील अनेक सूक्ष्म बदलांचं एक परिणाम आहे, हे लक्षात येईल.

बिंज ईटिंग म्हणजे केवळ अन्न सेवनावरचं नियंत्रण सुटणे नाही, तर भावनांवरचा सुटलेला ताबा असतो. सबब आत्मनिरीक्षण, संयम आणि आपण स्वत:साठी हीलिंगच्या प्रक्रियेत आहोत याबाबतचा आत्मविश्वास सदोदित असणे गरजेचे असते. बिंज इटिंगची समस्या कमी झाल्यास झोपेची गुणवत्ता सुधारते. पोटफुगी आणि अपचन कमी होते. तसेच क्रेविंग्स (विशेषत: साखरेच्या) कमी होणे, मधुमेह नियंत्रणात येणे, मन:स्थिती अधिक स्थिर राहणे, हार्मोनचं संतुलन पुन्हा मिळवणे हेही इतर लाभ यामुळे होतात. या प्रक्रियेत आपण बारीक झालो नाही म्हणून निराश होणं गैर आहे. त्याऐवजी शरीराच्या सूक्ष्म सिग्नल्सकडे लक्ष द्या. परिणाम उशिरा दिसू शकतात; पण ते नक्की घडत असतात. अशा वेळी हार मानणं केवळ एक पायरी दूर असलेल्या बदलाचं नुकसान होऊ शकतं.

# कपाशीतील मावा किडीच्या नियंत्रणासाठी काय करावे, जाणून घ्या सविस्तर

**दि.२९विदर्भ प्रजासत्ताक**

कपाशीवरील किडींच्या व्यवस्थापनासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन (खझच्) पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. यामध्ये किडींचे सर्वेक्षण, जैविक नियंत्रण, आणि आवश्यकतेनुसार रासायनिक नियंत्रण यांचा समावेश होतो. सद्यस्थितीत रोप अवस्थेतील मुळकुज रोग व्यवस्थापन आणि मावा किडीचे व्यवस्थापन कसे करावे हे पाहुयात...

कृषी विशेष

| किटकनाशके | मात्रा (१० लि. पाणी) |
|---|---|
| फ्लोनीकॅमीड | ५०% डब्लूजी किंवा ३ ग्रॅम |
| थायमिथोक्झाम | २५% डब्लूजी किंवा २ ग्रॅम |
| फिप्रोनील | ५% एससी किंवा ३० मिली |
| बुप्रोफेजीन | २५% एससी किंवा २० मिली |
| डिनोटेफुरन | ७०% डब्लूजी किंवा १.७४ ग्रॅम |
| फिप्रोनिल | १५% + इमिडाक्लोप्रिड ५% एससी किंवा १० मिली |
| फिप्रोनिल | १५% + फ्लोनिकामिड १५% डब्ल्यूडीजी किंवा८ ग्रॅम |
| ॲसीफेट | ५०% + इमिडाक्लोप्रीड १.८% एसपी २० ग्रॅम |

कपाशीतील रोप अवस्थेतील मुळकुज रोग व्यवस्थापन

मुळकुज रोगग्रस्त रोपे ठिकठिकाणी आढळून येऊ शकतात. सुरुवातीच्या लक्षणांनुसार रोपांना १ किलो ट्रायकोडर्मा व्हिरिडी अथवा ट्रायकोडर्मा हर्झियानम विरघळणारी पावडर किंवा द्रवरूप स्वरूपातील चांगल्या कुजलेल्या ५० किलो शेणखत किंवा कंपोस्टमध्ये मिसळून १ एकर क्षेत्रात जमिनीत मिसळावे.

किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी १२ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून रोगग्रस्त ठिकाणी आळवणी (स्पॉट ड्रेंचींग) करावी.

आळवणी करण्यासाठी तयार केलेल्या द्रावणाचे प्रमाण आळवणी करण्यासाठी मुळ्या ओल्या होतील एवढेच वापरावे.

कपाशीवरील मावा किडीचे व्यवस्थापन

अंतर मशागत करून पिक तण विरहीत ठेवावे.

नत्र खताचा संतुलीत वापर करावा.

१० ते १२ चिकट सापळे प्रती हेक्टरी लावावेत.

ढालकीडा व क्रायसोपा या मित्रकिटकाचे संवर्धन करावे.

५ टक्के निंबोळी अर्काची किंवा ॲझाडीरॅक्टीन ३०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाण्यातून प्रतिबंधात्मक फवारणी करावी.




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

नोट : वरील कीटकनाशकाचे प्रमाण नॅपसॅक/साध्या पंपासाठी आहे. पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीन पट वापरावे. पायरेथ्रॉईड गटातील कीटकनाशकाची फवारणी नोव्हेंबर महिन्याअगोदर सुरु करू नये, यामुळे पांढऱ्या माशीचा उद्रेक होऊ शकतो.

- पिकावरील कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प, किटकशास्त्र विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## महामंडळांवरील नियुक्त्यांना आता निवडणुकीनंतरच मुहूर्त; निवडणुकीत तिकीट त्यांना महामंडळ नाही

**विदर्भ प्रजासत्ताक १६**
**दि.२९मुंबई** १६राज्य सरकारच्या अखत्यारितील विविध महामंडळांचे अध्यक्ष आणि सदस्यांच्या नियुक्त्या या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतरच केल्या जातील. त्यामुळे या पदांसाठी इच्छुक असलेल्यांच्या पदरी तूर्त निराशाच आली आहे.भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी वर्धा येथे पक्षाच्या विदर्भस्तरीय मेळाव्यात हे स्पष्ट केले की, या नियुक्त्या निवडणुकांनंतर होतील. जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका तुम्ही पक्षाला जिंकून दाखवा, निवडणुकीत दमदार यश मिळवा, त्यानंतर लगेच या नियुक्त्या केल्या जातील, असे ते म्हणाले. याचा अर्थ निवडणुकांमधील यशाची बक्षिसी म्हणून नियुक्त्या केल्या जातील हे आता स्पष्ट झाले आहे.बावनकुळे यांनी हेही स्पष्ट केले की, निवडणुकांमध्ये ज्यांना तिकिटे मिळतील त्यांना महामंडळांवर नियुक्त केले जाणार नाही. महामंडळांचे महायुतीच्या ३ पक्षांमध्ये वाटपाचे सूत्र निश्चित करण्यास झालेल्या बैठकांमध्ये ६० टक्के महामंडळांचे वाटप ठरले होते.

# परिमंडळातील सर्वच शेतकऱ्यांना आता दिवसा वीज

## उपलब्धता तपासून तत्काळ कार्यवाहिचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती,**

शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी महावितरणने पाऊल उचलले असून शेतीसाठी दिवसा वीज पुरवठा करण्याची उपलब्धता आणि तांत्रिक बाबी शक्य असल्यास त्या भागातील शेतकऱ्यांना तत्काळ दिवसा आठ तासाकरीता वीज पुरवठा सुरू करावा,तसेच दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तांत्रिक फिजिबिलीटी नसेल तर आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा प्रस्ताव परिमंडळ कार्यालयाला पाठवावा असे निर्देश मुख्य अभियंता अमरावती परिमंडळ अशोक साळुंके यांनी दिले आहे.

शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा शासनाचा मानस असून त्यादृष्टीने राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० आणि मागेल त्याला सौर कृषी पंप या अत्यंत महत्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहेत. संप्टेबर २०२६ मध्ये पूर्ण होणाऱ्या मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेच्या माध्यमातून राज्यात १६ हजार आणि परिमंडळात ७८३ मेगावॅट वीज विकेंद्रीत स्वरूपाचे सौर प्रकल्प उभारून निर्मिती करण्यात येणार आहे.

असे असले तरी परिमंडळातील १८८ पैकी फक्त ९ सौर प्रकल्प पूर्ण होवून सुरू झाले आहे. परंतू तरीही परिमंडळातील शेतीला दिवसा आठ तास वीजेची उपलब्धता आणि तांत्रिक फिजिबीलीटी पूर्ण करणाऱ्या त्या सर्वच शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याचा निर्देश महावितरणच्या मुख्य कार्यालयाने दिले दिले आहेत. शेतीला दिवसा वीज देण्यासाठी आवश्यक तांत्रिक बाबी आणि उपकेंद्राचे सक्षमिकरण करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेशी जोडण्यात आलेल्या ३३ केव्ही उपकेंद्राची देखभाल दुरूस्ती करून उपकेंद्राचे सक्षमीकरण करण्यात आले आहेत. आवश्यक त्या ठिकाणी ६ पॉवर ट्रान्सफॉर्मरच्या क्षमतेतही वाढ करण्यात आली असून ५ उपकेंद्रात नविन पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आले आहे. त्याचबरोबर आरडीएसएस योजनेत परिमंडळात गावठान आणि कृषी फिडर वेगळे करून परिमंडळात २०५ नविन फिडर टाकण्याचे काम सुरू असून ४८ फिडरचे काम पूर्ण झाले आहे.याचबरोबर पुसद विभागात पेढी आणि जाम बाजार येथे नविन ३३ केव्ही चे उपकेंद्र उभारण्यात येत आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २९ जुलै २०२५

शहर/ग्रामिण

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा


# वाईन शॉपजवळ मद्यपान करणाऱ्यांवर उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई

## अमरावतीत एकाचवेळी १६ जणांवर गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती–**

किरकोळ मद्य विक्री (वाईन शॉप) जवळ मद्यपान करणाऱ्या ग्राहकांना मोकळे रान उपलब्ध देणाऱ्या दुकानदारांवर आणि अशा ठिकाणी मद्यपान करणाऱ्या ग्राहकांवर राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावतीने मोठी कारवाई केली आहे. दोन दिवसांत शहर व परिसरातील चार ठिकाणी धडक छापे टाकून एकूण १६ जणांविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे यांच्या आदेशानुसार, विभागीय उपआयुक्त डॉ. पराग नवलकर आणि अधीक्षक शशिकांत गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली.कारवाईदरम्यान अमरावतीतील वडाळी, बडनेरा,राष्ट्रीय महामार्गावरील आणि नवाथे चौक परिसरातील वाईन शॉप लगत असलेल्या स्नॅक्स, कोल्ड्रिंक व ड्रायफ्रुट दुकांनामध्ये मद्यपान सुरू असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाला मिळाली होती. त्यानुसार पथकांनी एकाच वेळी संबंधित ठिकाणी छापे टाकले.



सुंदरलाल चौकस्थित बालाजी लिकर्स किरकोळ मद्य विक्री (वाईन शॉप) लगत असलेल्या दिशा स्नॅक्स, ड्रायफ्रुट्स व कोल्ड्रींक्स,नवाथे चौक अमरावती येथील वाईन गॅलरी मद्यविक्री दुकानालगत असलेल्या महाकाल स्नॅक्स ड्रायफ्रुट्स अॅन्ड कोलड्रींक्स,दस्तुर नगर, बडनेरा रोड वरील आदीत्य वाईन शॉप किरकोळ मद्य विक्री (वाईन शॉप) लगत असलेल्या गजानन स्नॅक्स सेंटर अॅन्ड कोल्ड्रींक तसेच बोरगाव धर्माळे येथील मेजवानी ढाबा याठिकाणी अनधिकृतरित्या ग्राहकांना मद्य पिण्याची सुविधा उपलब्ध करून देणारे दुकान मालक अविश कमलाकर देशपांडे, प्रेमकुमार आतमदेव कापडी, विनय नाना सावनेरकर,देवेंद्र मुरलीधर चरोडे या दुकान मालकांवर महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६८ (अ) व (ब) अन्वये तसेच मानिक माहागाजी वरकडे,रोशन विठ्ठल काळे,सागर जानरावजी येवतकर,आकाश रविंद्र रॉय,मनन संदीप अग्रवाल, सारांश सुजीत देशमुख,विश्वेंद्र विरेंद्र ठाकुर,अनुप अरुण मुंधडा,शिरीष दिगांबर अवघाते,सुमित अनिल मोकनेअभिषेक मानिकराव घोगरे,चंद्रशेखर श्रीकृष्ण तायडे या ग्राहकांवर कलम ८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक सुभाष खरे, मुकुंद चिटमटवार, प्रभारी निरीक्षक संतोष वायाळ, दुय्यम निरीक्षक सादीक नौरंगाबादे, सागर वानखडे, प्रशांत वानखडे, कुंदन कुमरे,सहायक दुय्यम निरीक्षक अरविंद नांदने व जवान सुमित काळे, राहुल मोहीते, संदीप पेंढारकर, रुपेश मोकलकर, गजानन वाकोळे, विठ्ठल कष्टे, जगदीश चव्हाण, सुजीत जाधव, निलेश शेळके, भुषन नवघरे, सतिश बंगाळे, महिला जवान कु. कल्याणी दातीर, कु. दिपावली मानकर, कु. दिव्या खंडारे, कु. समिक्षा तायडे, सौ. वैशाली पारखी यांचे संयुक्त पथकाने केली.

# बुद्धिबळाच्या विश्वात 'दिव्या' तारा, 'बुद्धि'बळाची परंपरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर :**



अवघ्या १९ व्या वर्षांच्या दिव्या देशमुखने बुद्धिबळाच्या जागतिक स्पर्धेत महिला विश्वचषकाचा किताब मिळवला. दिव्या वयाच्या पाचव्या वर्षापासून बुद्धिबळ खेळत असून मागील १४ वर्षांपासून सातत्याने विजयाला गवसणी घालत आहे. तीन दिवस चाललेल्या अंतिम फेरीत दिव्याने संयम तसेच आक्रमकता यांचा उत्तम समतोल साधत अनुभवी ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीला ६४ चौरसाच्या खेळात पराभूत केले.

दिव्याने २०१० मध्ये केवळ पाचव्या वर्षी बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली. तिचे पालक डॉ. जितेंद्र आणि नम्रता यांनी तिला जवळच्या बुद्धिबळ अकादमीत घातले. नागपूरच्या शंकरनगर येथील त्यांच्या वसाहतीत बॅडमिंटन, बास्केटबॉल आणि बुद्धिबळ असे तीन खेळ शिकवले जात होते. दिव्याची मोठी बहीण आर्या बास्केटबॉल आणि बॅडमिंटन खेळत होती. दिव्याला हळूहळू या बुद्धिबळाची आवड निर्माण झाली आणि दोन वर्षांतच, जुलै २०१२ मध्ये पुदुचेरी येथे झालेल्या स्पर्धेत तिने सात वर्षांखालील पहिले राष्ट्रीय सुवर्णपदक पटकावले. त्यानंतर तिने मागे वळून पाहिलेच नाही. २०१३ मध्ये इराणमध्ये झालेल्या आठ वर्षांखालील आशियाई स्पर्धेत तिने विजेतेपद मिळवत आंतरराष्ट्रीय छाप सोडली. त्यानंतर ती पुढील वर्षी वर्ल्ड युथ चॅम्पियनशिपसाठी भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पात्र ठरली. २०१४ मध्ये, वयाच्या अवघ्या आठ वर्षे आणि पाच महिन्यांत, तिने दक्षिण आफ्रिकेतील डरबन येथे १० वर्षांखालील वर्ल्ड चॅम्पियनशिप जिंकली. तेव्हापासून तिने भारताचे ४० वेळा प्रतिनिधित्व केले असून, त्यात तिने ३५ वेळा पदक मिळवले आहे. यात २३ सुवर्ण, ७ रौप्य आणि ५ कांस्य पदकांचा समावेश आहे.

दिव्याच्या विजयानंतर तिच्या शंकरनगर येथील निवासस्थानी आनंदाचे वातावरण होते. दिव्याचे आई व वडील दोघेही डॉक्टर आहेत. दिव्याला घरातूनच बुद्धिबळाचा वारसा लाभला. दिव्याचे वडील, काका तसेच दिव्याचे आजोबाही बुद्धिबळ खेळायचे. दिव्याची काकू डॉ. स्मिता देशमुख यांनी घरी मिठाई वाटून आनंद साजरा केला. दिव्याच्या यशाचा आनंद आहे. या यशामागे अनेक वर्षांचे कष्ट आहेत, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

# खोज संस्थेच्या सोबत घेऊन विदर्भ कला शिक्षक संघ देणार लढा

## वाढीव शुल्कही रद्द करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

आदिवासी हे कलासक्त नागरिक आहेत. त्यांच्या 'वारली' पेंटिंगने देशाच्या राष्ट्रपती भवनापर्यंत मजल मारली आहे. मात्र ते रहात असलेल्या मेळघाटातच कलाध्यापक नाहीत. त्यामुळे रेखाकला हा विषय त्यांच्यापासून कोसो दूर गेला असून, तेथील विद्यार्थ्यांना ड्रॉईंगच्या परीक्षेलाही बसता येत नाही.

हे धक्कादायक वास्तव विदर्भ कला शिक्षक संघाने हेरले असून 'खोज' संस्थेला सोबत घेऊन ते या मुद्द्यावर लढा देणार आहेत. या लढ्यासाठी सोमवारी कला शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष विनोद इंगोले आणि 'खोज'चे ड. बंड्या साने यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, मेळघाटातील बहुतेक विद्यार्थी हे आश्रमशाळांच्या माध्यमातून शिक्षण घेतात. आदिवासी कल्याण विभागामार्फत या आश्रमशाळा चालवल्या जातात. परंतु या आश्रमशाळेत कलाध्यापकांची नियुक्तीच करण्यात आली नाही. तर दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्येही कलाध्यापकांचा अनुशेष असल्याचे निरीक्षण इंगोले आणि साने यांनी नोंदवले.

कलाध्यापक नसल्याने आदिवासी विद्यार्थी चित्रकलेच्या एलिमेंटरी आणि इंटरमिडीएट परीक्षेपासूनही दूर आहेत. या दोन्ही परीक्षांचे अर्ज शाळांमार्फत भरून घेतले जातात. परंतु संबंधित विषयाचे शिक्षकच नसल्याने मुख्याध्यापक आणि शाळांमधील इतर शिक्षक या विषयात स्वारस्य दाखवत नाहीत, असा मेळघाटातील पालकांचा अनुभव आहे. मेळघाटच्या दोन्ही तालुक्यात शाळा आणि आश्रमशाळांची एकत्रित संख्या ही शंभराहून अधिक आहे. परंतु तरीही तेथे कलाध्यापक नाहीत. दरम्यान वारली आणि इतर पेंटिंगच्या माध्यमातून चित्रकलेत रस घेणारे विद्यार्थी अशाप्रकारे दूर ठेवले जात असतील, तर ही बाब प्रशासनाने गंभीरतेने घ्यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. एवढेच नव्हे तर यासंदर्भात आश्रमशाळा चालवणाऱ्या आदिवासी विकास विभागाचे अपर आदिवासी आयुक्त आणि जिल्हा परिषदेच्या सीइओ यांची लवकरच भेट घेऊन त्यांच्या माध्यमातून हा विषय राज्याचे कला संचालनालय आणि शिक्षण मंत्र्यांपर्यंत नेला जाईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. याप्रसंगी सुमित्रा आहके, सोनू भास्करे, उषा बेलसरे, सुनील बेलसरे हे मेळघाटमधील कार्यकर्तेही उपस्थित होते.

मेळघाटात केवळ ६ शिक्षक विदर्भ कला शिक्षक संघाच्या आकडेवारीनुसार मेळघाटात केवळ सहा कलाध्यापक आहेत. चिखलदरा तालुक्यात चार आणि धारणी तालुक्यात दोन अशी त्यांची विभागणी आहे. या माहितीला जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागानेही दुजोरा दिला असून, चित्रकलेसाठी कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती केली होती. परंतु नंतर ते शिक्षक न्यायालयात गेल्याने सध्या अनुशेष निर्माण झाल्याचे स्पष्ट केले.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या १५० वर

## वनविभागाच्या मेहनतीचं फळ मेळघाटात वाघांची यशस्वी वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती,**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वन्यजीव संवर्धनासाठी करण्यात आलेल्या योजनांचा सकारात्मक परिणाम दिसून येत असून, सध्या या प्रकल्पात १५० वाघांचे वास्तव्य आहे. यामध्ये २५ नर, ४७ मादी आणि दोन वर्षांपर्यंत वय असलेले ७८ बछडे तसेच अन्य २७ तरुण वाघ समाविष्ट आहेत.मेळघाट व्याघ्र प्रकल्प हा महाराष्ट्रातील सर्वांत जुना आणि महत्त्वाचा व्याघ्र प्रकल्प असून, येथील जैवविविधता ही पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही अत्यंत मोलाची मानली जाते. प्रकल्प क्षेत्रातील संरक्षण उपाय, टेहळणी यंत्रणा, ड्रोन निरीक्षण, वॉच टॉवर्स, व गावकऱ्यांचे सहभाग यामुळे वाघांच्या मृत्यूदरात लक्षणीय घट झाली आहे.सामान्यतः वन्य प्राण्यांमध्ये नैसर्गिक मृत्यू किंवा माणसांशी होणाऱ्या संघर्षामुळे मोठा धोका असतो. मात्र, २०२४-२५ वर्षात फक्त एका वाघाचा मृत्यू झाला आहे, ही गोष्ट प्रशासनाच्या आणि वन विभागाच्या कार्यक्षमतेचे प्रमाण मानली जात आहे.मेळघाटातील स्थानिक आदिवासी व गावकरी या संवर्धन



प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यांना रोजगार, शिक्षण व आरोग्याच्या सुविधा दिल्यामुळे वन्यजीवांशी संघर्ष कमी झाला असून, वाघ व माणूस यांचा सहअस्तित्वाचा आदर्श मेळघाटाने प्रस्तुत केला आहे.

| | |
|---|---|
| एकूण वाघांची संख्या | : १५० |
| नर वाघ | : २५ |
| मादी वाघ | : ४७ |
| दोन वर्षांपर्यंतचे वाघ बछडे | : ७८ |
| वर्षभरातील मृत्यू वाघ | :फक्त १ |



हे खरोखरच अभिमानास्पद आहे! प्रकल्पांचं यश हे पर्यावरण व विकास यात संतुलन राखल्याचं उदाहरण आहे.जर अशीच कामगिरी सुरू राहिली, तर महाराष्ट्र व्याघ्र संरक्षणात देशात आघाडीवर राहील.– **डॉ.जयंत वडतकर** वन्य प्रेमी अभ्यासक

मेळघाट एक जैवविविधतेचं गड मेळघाटातील व्याघ्र प्रकल्प हे केवळ वाघांसाठीच नव्हे तर असंख्य इतर प्रजातींसाठी देखील सुरक्षित अधिवास बनला आहे. येथे बिबटे, अस्वले, सांबरे, चौशिंगा, गवा यांसारख्या अनेक प्रजाती आढळतात.

# १ ऑगस्टला अमरावती जि.प. मतदारसंघांवरील आक्षेपांची सुनावणी होणार विभागीय आयुक्तांसमोर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती** –अमरावती जिल्हा परिषदेच्या मतदारसंघांच्या प्रारुप रचनेवरील आक्षेपांची सुनावणी १ ऑगस्टला होणार आहे. विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्या दालनात सकाळी ११ वाजता ही सुनावणी सुरू होईल. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्हा परिषदेच्या मतदारसंघांचे प्रारुप आयुक्तांकडे सुपूर्द केले आहे. यापूर्वी त्यांनी प्राप्त झालेल्या आक्षेप व सूचनांचा विचार केला आहे.नव्या रचनेत चांदूर रेल्वे तालुक्यातील एक मतदारसंघ कमी झाला आहे. अचलपूर तालुक्यात एक मतदारसंघ वाढला आहे. मेळघाटच्या दोन्ही तालुक्यांतील एका मतदारसंघाचा अपवाद वगळता इतर सर्व मतदारसंघांची नावे बदलण्यात आली आहेत.काही ठिकाणी जवळची गावे सोडून दूरची गावे एखाद्या मतदारसंघात समाविष्ट करण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. जिल्हाभरातून प्राप्त झालेल्या अशा १८ तक्रारींची सुनावणी विभागीय आयुक्त घेणार आहेत.विभागीय आयुक्त या नात्याने त्यांना अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांतील तक्रारींची सुनावणी करावयाची आहे. यासाठी त्यांनी वेळापत्रक तयार केले असून



अमरावतीसाठी १ ऑगस्ट हा दिवस निश्चित केला आहे.सुनावणीनंतर मतदारसंघांच्या रचनेत किंवा नावात आयुक्त आवश्यक ते बदल करतील. त्यानंतर ११ ऑगस्टला ही रचना जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविली जाईल. १८ ऑगस्टला जिल्हा परिषदेच्या मतदारसंघांची अंतिम रचना घोषित केली जाईल.मतदारसंघांची अंतिम रचना घोषित झाल्यानंतर आरक्षण निश्चित केले जाणार आहे. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सोडत काढली जाईल. गेल्या पाच वर्षांतील आरक्षणाची स्थिती आधार मानून निवडणूक आयोगाच्या चक्राकार सूत्रानुसार आरक्षण ठरविले जाईल.आरक्षणामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी मतदारसंघ राखीव ठेवले जातील. त्यातील महिलांसाठीचे मतदारसंघही निश्चित केले जातील. अनारक्षित मतदारसंघांमध्येही महिलांसाठी काही जागा राखीव ठेवल्या जातील.


# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्य खात्यावर रेशनऐवजी येणार थेट रक्कम

## छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि वर्धा जिल्ह्यात लागू होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती** –

आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांच्या खात्यावर आता अन्नधान्याऐवजीची थेट रोख रक्कम हस्तांतरित करण्यात येणार आहे. राज्य शासनाने याबाबतचा शासन निर्णय शुक्रवारी जारी केला. हा निर्णय छत्रपती संभाजीनगर व अमरावती विभागातील सर्व जिल्हे आणि नागपूर विभागातील केवळ वर्धा जिल्ह्यासाठी लागू करण्यात आला आहे.

या योजनेचा शासन निर्णय २८ फेब्रुवारी २०२३ रोजी मंजूर झाला. त्यानुसार, या योजनेतून लाभार्थ्यांना जानेवारी २०२३ पासून प्रति महिना १५० रुपये थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार होते. मात्र, नंतर २० जून २०२४ रोजी या योजनेत सुधारणा करण्यात आली.



या सुधारित निर्णयानुसार, आता एप्रिल २०२४ पासून प्रति महिना प्रति लाभार्थी १६० रुपये थेट रोख रक्कम देण्यात येणार आहे. या रकमेने अन्नधान्याच्या जागी शेतकऱ्यांना थेट पैसे मिळणार आहेत. शासनाने आधी ठरवले होते की प्रति लाभार्थी १५० रूपये देण्यात येतील; पण नंतर या रकमेतील वाढ करून ती १६० रुपये केली आहे. हा बदल शेतकऱ्यांसाठी आणखी फायदेशीर ठरला आहे. याशिवाय, राज्य सरकारने या योजनेत अन्नधान्य वितरणातील गुंतागुंतीला कमी करण्यासाठी व वितरण सोपे व्हावे यासाठी लेखाधिकारी, आरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी यांना नियुक्त करून योजनेची योग्य अंमलबजावणी करणार असल्याचेही जाहीर केले आहे.

महाराष्ट्र फेअर प्राइस शॉपकिपर फेडरेशनचा विरोधऑल महाराष्ट्र फेअर प्राइस शॉपकिपर फेडरेशनने शासनाच्या या निर्णयाला विरोध दर्शविला आहे. फेडरेशनचे कार्याध्यक्ष संजय पाटील यांचे म्हणणे आहे की, ही योजना गरीब कार्डधारक जनतेची शुद्ध फसवणूक आहे. हक्काच्या रेशनपासून वंचित ठेवण्याचा हा प्रकार आहे. उद्या ही योजना सर्व लाभार्थ्यांसाठीही लागू केली जाईल. शासन गरीब लाभार्थ्यांना रेशनऐवजी रक्कम देऊन मोकळी होईल. यामुळे भूकबळी व उपासमारी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे शासनाने यावर फेरविचार करावा अन्यथा जनआंदोलन उभारले जाईल, रकमेतील वाढ करून ती १६० रुपये केली आहे. हा बदल शेतकऱ्यांसाठी आणखी फायदेशीर ठरला आहे. याशिवाय, राज्य सरकारने या योजनेत अन्नधान्य वितरणातील गुंतागुंतीला कमी करण्यासाठी व असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# बारमध्ये सरकारी फाईल्सवर स्वाक्षरी

## पालकमंत्र्यांचे चौकशीचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९नागपूर :** बारमध्ये शासनाच्या फाईल्स घेऊन बसलेल्या एका व्यक्तीचा व्हीडीओ समाज माध्यमावर प्रसारित झाल्याने प्रशासनात खळबळ उडाली असून या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. दरम्यान महाराष्ट्र शासन असे लिहिलेल्या फाईल्स नेमक्या कोणत्या विभागाच्या होत्या व ते कर्मचारी कोण याबाबत सोमवारी दिवसभर प्रशासकीय वर्तुळात चर्चा होती.शहरातील मनीषनगर भागातील एका बारमध्ये रविवारी सुटीच्या दिवशी तीन व्यक्ती महाराष्ट्र शासन लिहिलेल्या फाईल्सचा गठ्ठा घेऊन बसले होते. त्यापैकी एक व्यक्ती त्या फाईलवर स्वाक्षरी करीत होता. याचा व्हीडीओ व्हायरल झाल्यावर एकच खळबळ उडाली. दरम्यान पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या घटनेची गंभीरपणे दखल घेतली असून



या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहे. वर्धा येथे भाजपच्या बैठकीसाठी बावनकुळे गेले असता तेथे पत्रकारांनी नागपूरच्या घटनेकडे लक्ष वेधले असता ते म्हणाले विभागीय आयुक्तांशी मी याबाबत बोललेलो आहे, सायबर शाखेसोबतही सोबतही चर्चा केली आहे आणि त्याना यासंदर्भातील अहवाल सादर करण्यास सांगितला आहे.येत्या तीन दिवसात या प्रकरणात कारवाई झाल्याचे दिसेल.पालकमंत्री म्हणून मी या घटनेचे पूर्ण विश्लेषण करणार आहे कोणत्या विभागाची फाईल हे याची चौकशी सुरू झालेली आहे.दरम्यान बारमध्ये बसलेले ते कर्मचारी कोण होते. कोणत्या विभागाचे होते. त्या फाईल कशाच्या होत्या. रविवार असताना कार्यालयाबाहेर फाईल्स कशा गेल्या असे एक नव्हे तर अनेक प्रश्न या निमित्ताने चर्चेला आले आहे. नागपूर हा खुद्द मुख्यमंत्र्यांचा जिल्हा आहे. याच जिल्ह्यात या घटनेमुळे प्रशासनाचे लक्तरे वेशीवर टांगली गेली आहे. विशेष म्हणजे रविवारी खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपुरातच होते. ते शहरात असताना सरकारी फाईल्स कार्यालयाबाहेर नेणे ही गंभीर बाब आहे. कार्यालयनीन गोपनीयतेचा हा भंग असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी अशी मागणी आहे.

# महाराष्ट्र सरकारतर्फे दिव्या देशमुखचा भव्य सत्कार होणार

## CM फडणवीस यांचा व्हिडिओ कॉलद्वारे संवाद, म्हणाले- हा आमच्यासाठी गौरवाशाली क्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९नागपूर-**

नागपूरच्या १९ वर्षीय दिव्या देशमुखने ऋखइए महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकला आहे. अंतिम फेरीत टाय-ब्रेक फेरीत भारताच्या कोनेरू हम्पीला पराभूत करून तिने हे विजेतेपद पटकावले. विश्वविजेतेपद मिळवण्यासोबतच ती भारताची ८८ वी ग्रँडमास्टर देखील बनली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिव्या देशमुखला व्हिडिओ कॉल करत तिचे कौतुक केले आहे. महाराष्ट्र सरकारच्या वतीने दिव्याचा भव्य सत्कारही केला जाणार आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या तुमच्या यशाबद्दल आम्ही अत्यंत आनंदी आहोत. तुम्ही महाराष्ट्रातील, तसेच नागपूरमधील असल्याने अधिक आनंदानी गोष्ट आहे. यासोबतच, दिव्या देशमुखचा महाराष्ट्राच्या वतीने भव्य सत्कार करणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, किशोरवयीन अशी पहिली खेळाडू आहे जीने ग्रँड मास्टरचा



किताब मिळवला. अतिशय चांगली कामगिरी तिने केली आहे. २३ गोल्ड मेडल तिने जिंकले आहे. अतिशय होतकरू खेळाडू म्हणून आपण तिच्याकडे बघू शकतो. महाराष्ट्र सरकारतर्फे आम्ही सन्मान करू.पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, ज्यांनी आपल्या भारताचे आणि महाराष्ट्राचे नाव जागतिक स्तरावर नेले आहे, अशा खेळाडूंचा निश्चित सन्मान झाला पाहिजे. दोन्ही उपमुख्यमंत्री आणि क्रीडा मंत्र्यांना बोलून यावर लवकरच निर्णय घेतला जाईल. आपल्या खेळाडूंना चांगले वातावरण मिळावे व योग्य प्लॅटफॉर्म मिळावे यासाठी आपण नेहमीच प्रयत्नशील आहोत.

या फायनलमध्ये खेळणारे दोन्ही खेळाडू भारतीय होत्या हा देखील आपल्याला अभिमान आहे. आपल्या खेळाडूंनी इतर सर्व देशांच्या खेळाडूंना मागे टाकत फायनल गाठले ही खूप मोठी गोष्ट आहे. इतक्या कमी वयात फायनल पर्यंत पोहोचते आणि १९ व्या वर्षी महत्त्वाची स्पर्धा जिंकते ही अतिशय मोठी गोष्ट आहे.

# पोटे आयुर्वेद महाविद्यालयात चरक जयंती साजरी

## आयुर्वेदातील अभ्यास पद्धती तंत्रयुक्तीशिवाय अपूर्ण- डॉ. पार्लेवार यांचे प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती,**

आयुर्वेद समजण्यासाठी आणि त्याच्या प्रयोगासाठी तंत्रयुक्तीचे परिपूर्ण ज्ञान असणे महत्त्वाचे असते. आयुर्वेद ग्रंथांचे काळजीपूर्वक विश्लेषण केल्यास दिसून येते की, संशोधनाबाबत एक व्यापक दृष्टिकोन म्हणून पहिल्या जाते. तंत्रयुक्ती ही एखाद्या विज्ञानाचा अभ्यास करण्याची पद्धत किवा तंत्र असून ज्यामुळे त्याचा व्यावहारिक वापरासाठी योग्य व स्पष्ट अर्थ लावला जातो. तंत्रयुक्ती ही विज्ञान समजून घेण्याच्या किवा अर्थ लावण्याच्या पद्धतींची प्राचीन संकल्पना आणि समीक्षात्मक विश्लेषणाची संकल्पना म्हणून म्हणता येईल, ज्याची तुलना संशोधन पद्धतीच्या



विविध घटकांशी करता येईल, असे प्रतिपादन चारुता पार्लेवार यांनी केले.पी. आर. पोटे पाटिल आयुर्वेद, महाविद्यालय अमरावती, येथे संहिता सिध्दांत एवं संस्कृत ह्या विभागांतर्गत चरक जयंतीचे औचित्य साधून तंत्रयुक्ती आणि त्याचे उपयोगात्मक दृष्टिकोन या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख व्याख्याता म्हणून वैद्या. चारुता पार्लेवार, कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी वैद्य. श्यामसुंदर भुतडा, तर अतिथी म्हणून वैद्य. रणजीत देशमुख उपस्थित होते. आयुर्वेदातील कठीण भागाला समजेल आणि उमजेल असे ज्ञान सोप्प्या शब्दात व्यक्त करण्याचे मार्गदर्शन चारुता पार्लेवार यांनी केले

# भाजयुमोच्या शहर अध्यक्ष पदासाठी रस्सीखेच

## निकुंज राजा व ऋषिकेश देशमुख यांच्या नावांची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती-**

जिल्ह्यासह अमरावती शहर भाजपा कार्यकारणीचे अध्यक्ष पदांची निवड नुकतीच गत महिन्याभरापूर्वी पार पडली असताना आता अमरावती शहर भारतीय जनता युवा मोर्चाच्या शहराध्यक्ष पदाकरता अमरावती शहरातील युवा मोर्चाचे कार्यकत्यांनी आपली फिल्डिंग लावायला सुरुवात केली आहे.

अमरावती शहरांमध्ये अनेक राजकीय कार्यक्रमांमध्ये टीमला सोबत घेऊन आपले वर्चस्व दाखविण्याचा प्रयत्न युवा मोर्चाचे कार्यकर्त्यांकडून होत आहे. यामध्ये दोननावाची चर्चा जोमात आहे. भाजपात पिढीजात असलेले निकुंज राजा तर नव्याने आलेले ऋषिकेश देशमुख यांच्या मध्ये रस्सीखेच असल्याचे द बोलले जात आहे.या घडामोडींमध्ये आपआपल्या नेत्यांच्या माध्यमातून वरिष्ठ भाजपाचे नेत्यांना आपल्या नावाबद्दल जोर धरून पाहत आहे.




लोकसभा निवडणुकीच्या काळामध्ये ज्या नव्याने सक्रिय झालेल्या कार्यकर्त्यांनी नेत्याची मर्जी सांभाळणे करिता भाजपाच्या लोकसभेच्या उमेदवार नवनीत राणा असताना भाजपाचे विरोधी उमेदवाराचे खुलेआम काम करून

भाजप उमेदवाराला सोडून इतर पक्षाचे उमेदवारास मतदान करण्याचे जणू आव्हानच दिल्याचे सोशल मीडियाचे माध्यमातून दिसते. ऋषिकेश देशमुख हे भाजपाच्या वरिष्ठ महिला नेत्या असलेल्या एका नेत्याचे नातेवाईक असल्याचे सांगत आपले बॅनर पोस्टर झडकवताना शहरांमध्ये दिसून येतात.नेत्यांच्या माध्यमातून आपले वर्चस्व दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे. भाजपाच्या प्रत्येक चळवळीमध्ये सक्रिय असलेले निकुंज राजा हे भारतीय जनता पार्टीचे गेल्या कित्येक वर्षांपासून वडिलांचे कारकिर्दी पासून भाजपाचे निष्ठावान आहेत.

निकुंज राजा यांचे वडील गोपीनाथ मुंडे यांचे जवळचे कार्यकर्ते असल्याचे बोलले जात होते. परंपरागत भारतीय जनता पार्टीचे विचारसरणीला अभिप्रेत निकुंज राजा यांनी वडिलांप्रमाणे आपले राजकीय जीवन भाजपाकरता समर्पित केले आहे.

# बळीराजा संवाद अभियानातून शेतकऱ्यांशी थेट संवाद

## नरसिंगपूर, भगवानपूर, औरंगपूर येथे यशस्वी आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९नांदगाव पेठ-** शेतकऱ्यांच्या अडचणी, अनुभव आणि शंका जाणून घेण्यासाठी तसेच त्यावर उपाययोजना सुचवण्यासाठी राज्याचे ऊर्जामंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून बळीराजा संवाद अभियान राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत नरसिंगपूर, भगवानपूर व औरंगपूर येथे अभियानाचे आयोजन करण्यात आले.

उपविभागीय कृषी अधिकारी पंकज चेडे व तालुका कृषी अधिकारी प्रशांत गुल्हाने यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. गावाच्या सरपंच शिल्पा खवले, उपसरपंच नितीन पाचघरे, मंडळ कृषी अधिकारी निता कवाने, जिल्हा पिक विमा प्रतिनिधी अभिलाष नरोडे, तालुका प्रतिनिधी शुभम धोंडे, आत्म सदस्य प्रशांत टाकरखेडे, कृषी मित्र सुनील लंगडे, कृषी सखी सुचित्रा ठाकरे आणि ग्रामस्थ शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात शेतकऱ्यांना सध्या पिकांवर दिसून येत असलेल्या हुमनी अळी प्रादुर्भावाच्या नियंत्रणासाठी उपाययोजना व शिफारशी निता कवाने यांनी दिल्या. पिक विमा योजनेंतर्गत खरीप २०२५ साठी विमा घेणे का आवश्यक आहे, याबाबत सविस्तर माहिती अभिलाष नरोडे यांनी दिली. त्यांनी कृषी रक्षक पोर्टल आणि हेल्पलाइनबाबत देखील मार्गदर्शन केले.प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजना, फळबाग लागवड योजना, हवामान बदलाशी सुसंगत शेतीत सुधारणा अशा विविध विषयांवर सहाय्यक कृषी अधिकारी ज्योती ठाकरे यांनी माहिती दिली.

सर्व उपस्थित शेतकऱ्यांना माहितीपत्रके वितरित करण्यात आली.बळीराजा संवाद अभियान हे केवळ माहिती देणारे नव्हे, तर शेतकऱ्यांशी थेट संवाद साधणारे आणि त्यांच्यासाठी उपाययोजना सुचवणारे व्यासपीठ ठरत असल्याची प्रतिक्रिया यावेळी शेतकऱ्यांनी दिली.शेतकरी वर्गाने या अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# चक्क जिवंत रुग्णाला केले मृत घोषित

## मद्यधुंद डॉक्टरचा प्रताप, दारव्हा उपजिल्हा रुग्णालयाचा कारभार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९दारव्हा :** येथील उपजिल्हा रुग्णालयात मद्यप्राशन करून ड्युटी करीत असलेल्या एका डॉक्टरने जिवंत रुग्णाला मृत घोषित केले. एवढ्यावरच न थांबता डेथ मेमो बनवून शवविच्छेदन करण्याची तयारी केली. रुग्णाला शवविच्छेदन गृहाकडे नेत असताना त्याने हालचाल केली. ही बाब नातेवाईकांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी रुग्णाला पुन्हा तपासयला लावले असता, तो जिवंत असल्याचे निदर्शनास आले.त्यानंतर रुग्णाला उपचारासाठी यवतमाळ शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले.गोरेगाव येथील विषबाधा झालेल्या एका रुग्णाला दारव्हा उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले, त्यावेळी सेवेत असलेल्या डॉक्टरने कोणत्याही प्रकारच्या आपत्कालीन तपासणी न करता रुणाचा मृत्यू झाल्याचे सांगितले. डेथ मेमो तयार करून शवविच्छेदन करण्याची तयारी केली. रुग्णाला शवविच्छेदन गृहाकडे नेण्याच्या हालचाली सुरू केल्या. दरम्यान रुग्णाने हलचाल केली, तसेच डॉक्टर नशेत असल्याचा संशय नातेवाईकांना आला. त्यांनी डॉक्टरला पुन्हा तपासणी करण्यास सांगितले. तेव्हा रुग्ण जीवंत असल्याचे आढळले. त्यानंतर घाबरलेल्या डॉक्टरने डेथमेमो फाडून तातडीने रेफर पेपर तयार केले. नातेवाईकांनी संताप व्यक्त करत प्रसंगावधान राखून रुग्णालया यवतमाळ येथील शासीकय रुग्णालयात दाखल केले. तेथे रुग्णाची प्रकृती सुधारत असल्याचे सांगण्यात आले.



हा प्रकार काहींनी उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. राजेश मनवर यांना सांगितला. त्यानंतर अधीक्षक रुग्णालयात हजर पोहोचले, त्यांनी संबंधित डॉक्टरला याबाबत मेमो दिला आहे. या प्रकरणात मद्यपी डॉक्टरवर पुढे काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पामुळे लोणार सरोवराचे अस्तित्वच आले धोक्यात

## जैव वविविधता, पर्यावरणीय संतुलनाला धोका; त्वरित उपाययोजनांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९बुलढाणा-**

जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर आज आपल्या अस्तित्वासाठी झगडत असून त्याच्या नैसर्गिक, जैविक व वैज्ञानिक वैशिष्ट्यांना सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील त्रुटींमुळे गंभीर धोका निर्माण झाला आहे. शहरातील निघणारे सांडपाणी थेट सरोवरात मिसळत असल्यामुळे त्यातील जैवविविधता आणि पर्यावरणीय संतुलन पूर्णपणे ढासळत आहे. शहरातील सांडपाणी थेट सरोवरात जाण्यापासून रोखण्यासाठी नदीच्या बंधाऱ्यावर सुमारे २ कोटी ५० लाख रुपयांचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आला होता. मात्र, या प्रकल्पाच्या कामात गंभीर दोष आढळून आले आहेत.



त्यामुळे तो केवळ कागदावरच कार्यरत आहे. प्रत्यक्षात संपूर्ण सांडपाणी सरोवरातच मिसळले जात असल्याची गंभीर बाब उघड झाली आहे.मागील १५ वर्षांपासून ही समस्या कायम असून, अद्यापही याबाबत ठोस उपाययोजना होत नसल्याचे वास्तव आहे. परिणामी सरोवरातील सूक्ष्मजीव संस्था नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

> दि. २२ जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे प्रकल्पात क्षमतेपेक्षा अधिक सांडपाणी एकाच वेळी आले. त्यामुळे नदीच्या खड्ड्याला बांधलेली संरक्षण भिंत निरुपयोगी ठरली आहे. या भिंतीखालून सांडपाणी थेट सरोवरात गेल्याने त्यातील जैविक प्रणालीवर गंभीर परिणाम झाला आहे.प्रकल्पाची कार्यपद्धती तातडीने तपासून त्वरित दुरुस्ती करावी आणि सांडपाण्याचे पुनर्वहन करून सरोवराचे रक्षण करावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. सरोवराजवळ सांडपाणी प्रक्रियेद्वारे सांडपाणी दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी सोडण्याचा पर्याय तत्काळ राबवण्याचीही मागणी होत आहे.वाढणारी जलपातळी गंभीर बाब लोणार सरोवराची निरंतर वाढणारी जलपातळी ही गंभीर बाब आहे. खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात होणारे रुपांतर जैविक संस्थेवर आघात करणारी बाब आहे त्यामुळे या दृष्टीने संशोधन आणि त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे. - **राजेश मापारी,** माजी उपनगराध्यक्ष, लोणार

हे सरोवर जगातील खाऱ्या पाण्याच्या तीन विवरांपैकी एक आहे. येथे आढळणारे सूक्ष्मजीव हे जागतिक संशोधनासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जातात.

केंद्राच्या पथकाने केली होती पाहणी मार्च महिन्यात केंद्रीय संशोधन संस्थेच्या डॉ. काकोल बॅनर्जी यांच्या पथकाने रामसर साईटचा दर्जा असलेल्या लोणारच्या मानांकनाची तपासणी केली होती. त्यावेळी पथक नमुने घेऊन गेले होते. त्यानंतर त्याचा अहवाल केंद्र शासनाला सादर करण्यात येणार होता. तथापि, या संदर्भातील अहवाल समोर आला नाही.

# ई- क्लास जमीन पोखरून लाखोंचा मुरुम शासकीय कामावर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चांदूरबाजार**

महाराष्ट्र व मध्यप्रदेश व महाराष्ट्र सीमेवर उत्खनन वाढले मध्यप्रदेश सीमेवरील परिसरतील मुरुम माफियांनी अक्षरशः पोखरून काढला आहे. सरकारी आणि खासगी गायरान जमिनी खोदून मुरूम आणि माती चोरण्याचा प्रकार गेल्या १२ वर्षांपासून सुरू आहे. एकेकाळी नैसर्गिक सौंदर्याने नटलेला हा भाग खड्ड्यांनी व्यापला आहे. मोठमोठी भगदाडे पाडून शेकडो एकर गायरानाचे वाटोळे केले जात आहे. वारंवार तक्रारी केल्यानंतर १० वर्षांत एकाच माफियांवर दोन कारवाया झाल्या. त्यामुळे आजही या परिसरातील शिवारात असलेल्या सरकारी गायरान आणि मध्यप्रदेश मधील शिवारातील गायरान तसेच काही खासगी जमिनी पोखरण्याचा सपाटा सुरूच आहे. महसूल विभाग मात्र अपुरे मनुष्यबळ, कामाचा व्याप अन मुरुम माफियांची दहशत आदी कारणे देत दुर्लक्ष करत आहे.सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या चांदूरबाजार तालुक्यातील महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश सीमेवर अनेक पहाड असून मुरुम माफिया यांनी उत्खनन केले असल्याचे चित्र आहे. मुरुम माफिया यांनी महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश सीमेवर उत्खनन लावले आहे. या परिसरातील डोंगरही पोखरण्याचा धडाका लावला आहे. त्यामुळे पहाहांची नैसर्गिक रचना नष्ट झाली असून मोठमोठे खहे आणि खदानीसारखा भाग तयार झाला आहे.या शेकडो एकर जमिनीतून मुरूम व मातीचा बेकायदेशीर उपसा केला जातो. विटा तयार करताना मातीत मुरूम मिसळावा लागत असल्याने हा मुरूम चोरला जातो. माफिया या ठिकाणाहून चंगुलेला मुरूम अनेक शासकीय कामावर वापरत आहे, तर प्रतिब्रास १३०० रुपये दराने याची विक्री केली जाते.मुरुम माफियांची दहशत आणि सतर्क यंत्रणा या परिसरात मुरुम माफियांची मोठी दहशत आहे. विरोध करणाऱ्या शेतकऱ्याच्या आणि महसुली अधिकाऱ्यांच्या अंगावर वाहने भिरकावण्याचे प्रकार एकेकाळी झाले असल्याने या परिसरातील जमीनदारही हादरले आहेत. दुसरीकडे या माफियांची यंत्रणा खूपच सतर्क आहे. हे लोक कार्यालयीन वेळेच्या आत आणि नंतर कामाला लागतात. तहसील कार्यालयाच्या वाहनांवर यांचे लक्ष असते. त्यांचे ठरावीक कामगार पूर्णपणे महसूलप्रशासनाची माहिती देतात. यामुळे चोरीचा मार्ग मोकळा होतो. अशा होत असलेल्या प्रकारामुळे सातपुडा पर्वताचे नैसर्गिक सौंदर्य लोप पावत असल्याचे दिसून येत आहे.

# पुलाच्या मागणीकडे दुर्लक्ष करून आश्रमात न राहण्याची नोटीस

## चांदूरबाजार प्रभारी तहसीलदारांचे देवस्थानाला अफलातून पत्र



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९जसापूर**

दोन दिवसांच्या पावसाने मेधानदीला आलेल्या पुरामुळे देऊरवाडा परिसरातील काजळेश्वर आश्रमाचा गावाशी संपर्क तुटला असून आश्रमातील बीडवरुन आलेले २४ भाविक अडकल्याची बातमी वृत्तपत्रात झळकताच चांदूरबाजारचे प्रभारी तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी घटनास्थळावर दाखल झाले त्यांनी आश्रमवासीयांची नदीवरील पुलाची मागणी फेटाळून सदर आश्रमच ई-क्लास जमिनीवर असल्याने अतिक्रमित असल्याचे कारण सांगून आश्रमवासींनी पावसाळ्यात आश्रमात वास्तव्य करु नये राहिल्यास भविष्यात पूर परिस्थितीत आश्रमात हानी पोहोचल्यास त्याला प्रशासन जबाबदार राहणार नाही, अशी अफलातून नोटीस दिल्यामुळे सर्वत्र याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

या आश्रम स्थानावर भडोचवरुन गोविंद प्रभू आले होते, अशी माहिती आश्रमाचे सूरज कारंजेकर यानी दिली.मेघा नदीला आलेल्या पुरामुळे देऊरवाडा काजळेश्वर देवस्थानामध्ये अडकलेले बीड जिल्हातील २४ भाविक रात्रभर देवस्थानामध्येच रात्री मुक्काम करून पुरावे पाणी कमी झाल्यानंतर काल सकाळी गावी परतले आहे.वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर चांदूरबाजारचे प्रभारीतहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी, मंडळ अधिकारी पठाण व तलाठी मनवर यांनी रविवारी दुपारी देऊरवाडा संगम ठिकाणी मेघा नदीच्च्या बाजूला असलेल्या काजळेश्वर देवस्थानला भेट दिली असता त्या ठिकाणी सूरज कारंजेकर महाराज यांची भेट घेऊन तहसील प्रशासनाच्यावतीने त्यांना नोटीस देण्यात आलेली आहे. काजळेश्वर आश्रम हे मेघा नदीपात्र देऊरवाडा पलीकडे मौजा वडुरा येथे आहे. या आश्रमामध्ये भक्तगण सह बरेच लोक नेहमी वास्तव्यास असतातः परंतु सद्यस्थितीत पावसाळ्याचे दिवस असल्याने मेधा नदीला कधीही पूर येऊ शकतो. पूर स्थिती निर्माण होऊ शकते. तरी आपणास

तहसील प्रशासन चांदूर बाजारकडून सतर्क करण्यात येते की, आपण सर्व पावसाळ्यापर्यंत काजळेश्वर आश्रम (मंदिर) येथे वास्तव करू नये. योग्य सुरज्जित स्थळी तात्काळ स्थलांतरित व्हावे. भविष्यात पूर परिस्थितीमुळे आश्रमातील कोणतीही हानी झाल्यास त्याला प्रशासन जबाबदार राहणार नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी, असे त्या पत्रात नमूद केलेले आहे.महानुभाव पंथाचे भाविक या मठामध्ये जिल्ह्यातील व इतर राज्यातील दर्शनासाठी येतात काही थोड्या भाविकांना तात्पुरती येथे राहण्याची व्यवस्था आहे, असे सूरज कारंजेकर महाराजांनी प्रशासनाला सांगितले आहे. परंतु या ठिकाणी नदीला पूल नसल्यामुळे इतर राज्यातील भाविकांना दर्शनार्थ येता येत नाही. ही समस्या दूर करण्याचा प्रस्ताव तहसीलदारांनी वरिष्ठांना पाठविणे अपेक्षित असताना पावसाळ्याचे दिवसात भाविकांना आश्रमात राहू नये, अशी अफलातून नोटीस आश्रमाला दिली.सदर आश्रमाचे ठिकाण हे ऐतिहासिक चक्रधरस्वामीच्या पदस्पानि पावन स्थळ आहे. तसेच सदर आश्रम याची नव्याने उभारणी सन १९८३ मध्ये झाली. तेव्हापासून याची नोंद महसूल विभागाच्या सात-बारावर आहे. दरम्यान महाराष्ट्र शासनाच्या जीआरनुसार या आश्रमाचा कोणताही कर लागत नाही, याची जिल्हाधिकाऱ्याऱ्यांनी दखल घेऊन नदीवर पूल बांधून देण्याचा आदेश द्यावा, अशी मागणी आश्रमाचे प्रमुख सूरज कारंजेकर यांनी केली.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा M-8605948853

# श्री महाकाल कावडयात्रेने दर्यापूर दुमदुमले; शेकडो कार्यकर्त्यांचा सहभाग, लाखपुरी येथून पवित्र जल पोहोचले दर्यापुरात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९दर्यापूर**

दर्यापूर श्री हनुमान व्यायाम क्रीडा मंडळ बोसाद्वारा संचालित श्री महाकाल क मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही आवण महिन्याच्या पहिल्या सोमवारी पूर्वसंध्येला कावडयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. बम बम भोले, जय भोलेनाथ अशा जयघोषानी दर्यापूरनगरी दुमदुमून गेली.

कावड यात्रेचे विधिवत पूजन दर्शना किशोर डोके यांनी केले. मंडळाचे अध्यक्ष ओंकार कटानमत, गुरुवर्य गाबिंद धुरटे, उपाध्यक्ष गजानन शंके, सचिव प्रा संजय पवार, अजय वसू, दिलीप चव्हाण व कावड़ मंडळातील महाकाल भक्त पामू बुदिले, दिनेश धुराटे, प्रागय बिहाडे, गणेश धराटे मंगेश धुराटे, योगेश सवाई, सुधीर कोडापे, पवन पुणारे, सागर मलिये, शिवा उटाबे, विकी खारोडे, निहाल ठाकूर, अंकुश पवार, मोहन बुदेले, राहुल मलिये, विशाल ठाकूर, अजय आवारे, प्रेम बुंदेले, पंथन अजमिरे, निखिलेश ठाकूर, शुभम गुजर, राज चंदनपत्री, रोहित चंदनपत्री, स्वप्नीलविल्हेकर, शुभम विल्लेकर, सागर गोलाईत, विकी कट्धारमल, गौरव पुणारे, गोविंद शर्मा शेखर फुटवाईक रोहित गुजर, निखिल धुरादें प्रज्वल कपिले, शुभम चंदन, विशाल खेडकर, शुभम वाकोडे, योगेश अकोटकर, वैभव धुमाळे, सागर शिंगणे, अभिजित वरुडकर, पिंटुकाने, पंकज मात्रेअंकुश मंडावरे, मंगेश दुर्वे, भावेश ठाकूर, सुमित ठाकूर, सूरल ठाकूर, अक्षय पारवे, सुमित चज्ञान, यश चंदनपत्री, विशाल ऊर्फ मुल्या ठाकुर, विजय मेश्राम, शंकर भारसाकडे विकास रखेकर, सुमित तांबे, अजय बायस, अमर भले, लखन बुटिले, नीरज शंके, स्पेश बुटेले, करण माहुरे, सुजल बुदेले, केतन बुदिले, पवन माकोडे, मयूर गावडे, तेजस बुडेले, लखन धुराटे, प्रफुल्ल ढोके, दर्शन लोखडे, निखिल खोरगडे, संयोजक रोहित धुराटे आदी उपस्थित होते.

कावड्यात्रेचे सहकारी रात्री लाखपुरी येथे पोहोचले असता संस्थेचे अध्यक्ष राज दहापुते यांनी त्यांचे स्वागत केले व रात्री बारा वाजता लाबपुरी येथून तशेचराला दर्शन घेऊन पूर्णानदीचे तीर्थ लोधरावर अर्पण करून नंतर सर्व पूर्णानदीचे तीर्थ घेऊन दर्यापूरकडे खाना झाले. पहिल्या श्रावण सोमवारी सकाळी त्यांचे दर्यापूरनगरीमाये आगमन झाले असता महादेवाचे पिहीवर पूर्णा नदीचे तीर्थ अर्पण करण्यात आले. उपस्थित सर्वांचे संयोजक रोहित पुराटे यांनी आभार व्यक्त केले.

# गाव नमुना आठ 'अ' व घरकुलासाठी माकपचा 'एल्गार'गावठाण विस्तार करण्याची मागणीमुख्याधिकाऱ्यांना दिले निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नांदगाव खंडेश्वर**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात १० ऑगस्ट २०१५ पासून गावठाण तथा शासकीय जागेत इमला उभारुन राहणाऱ्या भोगवटा धारकांचा भूखंड कायम करून गाव नमुना ८-अ द्या. या मागणीच्या लब्चाला सुरुवात झाली होती. अनेक आंदोलने, मोर्चे काढून भूमि अभिलेख कार्यालयाकडून भोगवटा धारकांची मोजणी करण्यात आली असता विभागाने नकाशे तयार केले आणि मोजणी की भरण्यासंदर्भात नगरपंचायतला पत्रव्यवहार करण्यात आला.

नगरपंचायतच्या नाकर्त्या धोरणामुळे भोगवटाधारकांचा भूखंड कायम होवू शकला नाही. त्यामुळे गाव नमुना ८-अ नसल्यामुळे प्रधानमंत्री आवास योजनांच्या लाभापासून वंचित आहे. हा गंभीर प्रश्न नांदगांव खंडेश्वर शहरातील भोगवटा धारकांचा आहे. संबंधित विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र तातडीने जमा करून भूमी अभिलेख कार्यालयाची मोजणी फी भरून गाव नमुना ८-अ मिळण्याचा मार्ग सुकर करावा व गावठाण विस्तार करून मागेल त्याला जागा उपलब्ध करुन द्यावी, अन्यथा येणाऱ्या पुढील काळात मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्यावती ने भोगवटा धारकांमध्ये जनजागृती करून जमिनीच्या हक्काचा लढा तीव्र करण्याचा इशारा चानिवेदनाद्वारे देण्यात आला यावेळी माकप तालुका मुख्याधिकारी सचिव श्याम शिंदे, मोसिन शेख, महिंद्रा चौकडे, कालेश्वर पुंड, किशोर शिंदे, लक्ष्मीबाई सोळंके, लता बावी सधळे, शालू बावीसथळे, कल्पना सोळंके, जिजा राऊत, माला कोडवते, आशा सोळंके, बबिता सुहागपुरे, सुमित्रा खानंदे, लीला सोनवणे, वंदना कोहळे, साहेबराव रावेकर यांच्यासह उपस्थित होते.

# वेदमूर्ती, पद्मश्री आचार्य गणेश्वर शास्त्री द्रविड यांची तीर्थक्षेत्र सोनारखेड येथील अध्यात्म ज्ञानपीठास आशीर्वचन भेट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

श्री ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज इंगळे उर्फ दास ज्ञानेश्वर वैष्णव वारकरी ट्रस्ट, रजिस्ट्रेशन नंबर इ. ७३९ तालुका भातकुली जिल्हा अमरावती द्वारा श्री दास ज्ञानेश्वर अध्यात्म ज्ञानपीठ, तीर्थक्षेत्र सोनारखेड येथे नुकतीच वेदमूर्ती गणेश्वर शास्त्री द्रविड यांनी भेट दिली. तपोमूर्ती आचार्य गणेश्वर शास्त्री द्रविड वेद, कृष्ण यजुर्वेद, तैतिरीय शाखा, शुक्त यजुर्वेद, शतपथ ब्राह्मण, वेदांग, न्यायादीदर्शन, पुराण, इतिहास, राजशाख, धर्मशाथ, काय कोश, ज्योतिष, तंत्रगम, श्रोत जाणणारे विद्वान आहेत ते ग्रह, नक्षत्र आणि चौघडीया या विषयांतील तज्ञांपैकी एक असल्याने दुर्मिळ विद्वानांमध्ये त्यांची गणना होते. कोणत्याही मुहुर्तावर अभ्यासांती उपाय शोधण्याचे सामर्थ्य असलेल्या पू. गणेश्वर शास्त्रीचे ज्योतिषशास्त्र क्षेत्रात अतुलनीय योगदान असून ते जगद्गुरू रामानंदाचार्य पुरस्काराने सन्मानित आहेत. या घराण्यालाच विद्वतेचा वडिलोपार्जित वारसा आहे.देशातील महान विद्वानांमध्ये सर्वमान्य श्री. गणेश्वर शास्त्री द्रविड हे एक आहेत. ते धर्मप्रचारार्थ भारतभर भ्रमण करतात, ते काशीतील विद्यालयात विद्याभ्यास शिकवतात ते रामघाट येथील श्री वहुभराम शालिग्राम सामवेद विद्यालयाचे संचालक आहेत. येथे विद्यादान आणि ज्ञानदानाचे पवित्र कार्य निरंतर सुरू आहे. त्यांनी परदेशी नागरिकांना देखील हिंदू धर्माचे शिक्षण दिले आहे. गणेश्वर शास्त्रींनी काढलेली विशेष मुहुर्त - अयोध्येतील 'श्रीरामललाची' मूर्ती, त्यांनी काशी विश्वनाथ धामचे भूमीपूजन आणि लोकार्पण दोन्ही शुभ मुहुर्तांवर केले आहे. अयोध्येतील श्री राममंदिराच्या पायाभरणीसाठी त्यांनी दुर्मीळ ३२ सेकंदाचा सूक्ष्म मुहूर्त आणि श्री रामललाच्या प्राणप्रतिष्ठेचा सर्वोत्तम ८४ सेकंदाचा 'अभिजीत' मुहुर्त काढला. काशीमधून वर्ष २०२४ मध्ये वाराणसी लोकसभा मतदारसंघाकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. त्याचा मुहूर्तही श्री. गणेश्वर शास्त्री द्रविड यांनीच काढला होता. विदर्भाची प्रती आळंदी म्हणून गणल्या जाणाऱ्या या अध्यात्म ज्ञानपीठास द्रविड गुरुजींनी भेट दिली यावेळी अध्यात्म ज्ञानपिठाचे पिठासीन आचार्य वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ विद्वत प्रवर आदर्श व्यक्तिमत्व ह. भ. प. गु. ज्ञानेश्वर महाराज इंगळे उर्फ दास ज्ञानेश्वर यांचे हस्ते तपोमूर्ति श्री. गणेश्वर शास्त्री द्रविड यांचे पूजन करण्यात आले. मंदिराच्या गर्भ गृहातील माउली महावैष्णव संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, संत श्री संपत महाराज, भगवान सिद्धेश्वर यांचे दर्शन, तथा श्री दास ज्ञानेश्वर लिखित ग्रंथ संपदेविषयी विचारणा, अध्यात्म ज्ञानपिठातील नित्य चालत असणाऱ्या वारकरी सांप्रदायिक उपक्रमा विषयी आनंद, समाधान व्यक्त करत व पुढेही हे सत्कार्य असेच सुरु असावे या करीता कृपा कटाक्षे न्याहाळून मंगल आशीर्वचन देऊन उपकृत केले.

# शिराळा ते चांदूरबाजार रस्ता दोन वर्षांतच उखडला; २०० कोटी पाण्यात?

## सार्वजनिक बांधकाम विभागाची डोळेझाक, अपघाताची शक्यता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियंत्रणातील 'हायब्रीड ॲन्युटी' अंतर्गत निर्माण केलेला अमरावती, शिराळा ते चांदूरबाजार या दरम्यान रस्ता अवघ्या दोन वर्षातच उखडला आहे. तब्बल २०० कोटींच्या निधीतून साकारलेल्या या डांबरीकरणाच्या रस्त्यावर हल्ली जागोजागी खड्डे पडले असून अनेक ठिकाणी तो दबला आहे. त्यामुळे हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाच्या धर्तीवर खरेच साकारण्यात आला का? असा सवाल उपस्थित होतो. परिणामी मुख्य अभियंत्यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

सरकारने मोठा गाजावाजा करून 'हायब्रीड ॲन्युटी' अंतर्गत रस्त्याचे जाळे निर्माण करण्याचा दावा केला आहे. मात्र अमरावती, शिराळा ते चांदूरबाजार या दरम्यान ३० किमी लांबीच्या या रस्त्यावर हल्ली वाहनचालकांना 'डॉन्सिंग कार' सारखा अनुभव येत आहे. या रस्त्याची निर्मिती करताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष केल्याचे आता सिद्ध झाले आहे. कारण हा रस्ता अनेक जागी 'सिंक' झाल्यामुळे तो साकारताना जमिनीवर डांबरीकरणात वापरलेले साहित्य दर्जाहीन असल्याचे स्पष्ट होत आहे. हा रस्ता निर्माण होऊन पाच वर्षे झाले, पण तो दोन वर्षांतच उखडला आहे.

**पावसाचे पाणी तुंबले, अपघाताची शक्यता**

हा रस्ता जागोजागी दबला (सिंक) असल्याने पावसाचे पाणी साचून आहे. या रस्त्याची निर्मिती करताना योग्य ते साहित्य, मशिनरीचा वापर झाला नाही. त्यामुळे आता डांबराचे प्रमाण आणि दर्जा तपासणाऱ्या यंत्रणेवर कारवाई करावी लागणार की काय? असे दिसून येत आहे. हल्ली पावसाळ्यात या रस्त्यावर जागोजागी पाणी साचत असल्याने अपघाताची शक्यता बळावली आहे. या रस्त्याने ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना कमालीची कसरत करावी लागत आहे.

# आठवडे बाजार परिसरातील अतिक्रमण हटवले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२९अचलपूर**

येथील आठवडे बाजार उपजिल्हा रुग्णालयाच्या परिसर व गुरांच्या दवाखान्याच्या आजूबाजूच्या परिसरातील अवैध अतिक्रमण आज सोमवारी पोलीस बंदोबस्तात हटवण्यात आले यावेळी बघ्यांनी तुफानी गर्दी केली होती. नगरपरिषदेचा बांधकाम विभाग आरोग्य विभाग व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने ही अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली ही मोहीम सकाळी दहा वाजेपासून सुरू करण्यात येऊन दुपारी तीन वाजता थांबवण्यात आली प्राप्त माहितीनुसार यामध्ये जवळपास ३२ दुकाने हटवण्यात आली यात एक गॅरेज पानखोके जोडे चपलांचे रस्त्यावरील दुकान यासह आदी हटविण्यात आले तर अवैधरित्या लावण्यात आलेल्या व्यावसायिकांच्या ९ लोटगाड्या जप्त करण्यात आल्या


# विद्यार्थ्यांच्या हाती येणार करिअर कार्ड काय व्हायचंय हे शाळेतच कळणार

## राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचा नव्या सत्रात अभिनव उपक्रम

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

शालेय शिक्षणालाच रोजगारक्षम बनविण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) उपक्रम हाती घेतला आहे. नवीन शैक्षणिक धोरणात व्यावसायिक शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. याच धोरणाची अंमलबजावणी करताना एससीआरटीने आता 'करिअर कार्ड' हा पर्याय स्वीकारला आहे. १३ क्षेत्रातील ५०० प्रकारच्या रोजगाराची माहिती या, कार्डद्वारे विद्यार्थ्यांना मिळणार आहे. त्यामुळे आपल्याला, करिअर कोणत्या क्षेत्रात करायचय, याचा मंत्र विद्यार्थ्यांना शाळेतच मिळणार आहे. करिअर कार्ड विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे व क्षमतेनुसार योग्य करिअर निवडण्यास मदत करणार आहे.विविध क्षेत्रांतील




करिअरच्या संधी, आवश्यक कौशल्ये आणि शिक्षणाची माहिती देण्यात येणार आहे. सहावीपासून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम शिक्षण देण्यावर भर आहे. अनेकदा विद्यार्थी पदवी घेऊन महाविद्यालयातून बाहेर पडतात. मात्र, त्यांना आपल्या करिअरची योग्य दिशा मिळत नाही. मग विद्यार्थ्यांचा मनातबेरोजगारीचा न्यूनगंड तयार होतो. त्यामुळे हा उपक्रम सुरु केला आहे.संबंधित करिअरसाठी आवश्यक क्षमतांची माहिती आवडीच्या करिअरसाठी कोणता अभ्यासक्रम करावा.त्यात प्रवेश कसा मिळवायचा. त्यासाठी शैक्षणिक पात्रता कोणती संबंधित अभ्यासक्रम शिकिवणाऱ्या संस्था कोणत्या आणि त्या कुठे आहेत, त्या अभ्यासक्रमाचे शुल्क किती आहे, तेथे कोणती शिष्यवृत्ती, कर्ज मिळते का? हा अभ्यासक्रम केल्यानंतर कुठे-कुठे काम मिळू शकते. तेथील अपेक्षित उत्पन्न किती असेल आदींची माहिती या कॉर्डात राहणार आहे. त्यामुळे या कार्डचा विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे.

### करिअर कार्ड मराठीत कधी मिळणार ?

पाचशे रोजगारांच्या या करिअर कार्डची निर्मिती युनिसेफ संस्थेने केली आहे. हे कार्ड इंग्रजी आणि हिंदी भाषांत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी हे कार्ड मराठी भाषेत तयार केले जात आहे. यासंदर्भात नुकतीच शिक्षकांची कार्यशाळा घेण्यात आली. आता या कार्डचे भाषांतर सुरू असून, लवकरच ते विद्यार्थ्यांच्या हाती येणार आहेत.

### विद्यार्थ्यांचे करिअर कार्ड काय असणार?

विद्यार्थ्यांना करिअर कार्ड संदर्भात कशी मदत पुरवावी, यासाठी एससीईआरटीने नुकतीच १५ ते १७ जुलैदरम्यान राज्यातील निवडक शिक्षकांचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षण घेतलेले शिक्षक डायटच्या साहाय्याने आपापल्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांपर्यंत हे कार्ड पोहोचविणार आहेत.

### विद्यार्थ्यांना शाळेतच करिअरचे बाळकडू

करिअर कार्डची निर्मिती करण्यात येत असून, विद्यार्थ्यांना शाळेतच करिअरचे बाळकडून शिक्षकांमार्फत देण्यात येणार आहेत.


# 'सखी निवास' योजना वाऱ्यावरच जिल्ह्यात जनजागृतीचाही अभाव

## अंमलबजावणीअभावी अनेक वर्षांपासून योजना थंडबस्त्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

नोकरी, प्रशिक्षणासाठी शहरात येणाऱ्या एकल महिलांना सुरक्षित निवास मिळावा, या उद्देशाने केंद्र सरकारने दोन वर्षांपूर्वी 'सखी निवास' ही योजना जाहीर केली. मात्र, अजूनही अनेक ठिकाणी ती अमलात आलेली नाही वा बंद पडली. यामुळे महिला सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

जिल्ह्यात सध्या 'सखी निवास'करिता जागा शोधण्याचे काम सुरू आहे. जागा निश्चित झाल्यानंतर तेथे 'सखी निवास' सुरू केले जाणार आहे. वेगवेगळ्या आस्थापनांमध्ये नोकरी करणाऱ्या महिलांना सुरक्षित निवारा मिळावा, या उद्देशाने शासनाने ही योजना सुरू केली आहे. विशेष म्हणजे, सदर योजनेबाबत जनजागृती केली



जात नसल्याने नागरिकांकडून मागणी केली जात नाही. यामुळेच ही योजना जिल्ह्यात आतापर्यंत थंड बस्त्यात राहिली. महिला व बाल कल्याण विभागाच्या वतीने योजनेबाबत जागृती होणे गरजेचे आहे.तेंव्हाच या योजनेचा उद्देश सफल होईल.या योजनेच्या लाभासाठी शासनाने काही अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या व पात्र असलेल्या नोकरदार महिलांसाठी 'सखी निवास' योजनेत या महिलेसमवेत १८ वर्षापर्यंतची मुलगी व ५ वर्षापर्यंतचा मुलगा राहू शकतो.'सखी निवास' योजना ही नोकरी करणाऱ्या महिलांसाठी आहे. सुरक्षित आणि परवडणाऱ्या निवासाची सोय केली जाते. महिलांना निवारा, जेवण, कपडे, वैद्यकीय सुविधा आणि इतर आवश्यक प्रशिक्षण दिले जाते.

# युवा स्वाभिमान पार्टी प्रेरीत स्वाभिमान हॉकर्स युनियनच्या वतीने मीठभाकर खावून आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अमरावती महानगरपालिकेने चालविलेल्या हॉकर्स हटाव अभियानाचा युवा स्वाभिमान पार्टीव्दारा स्वाभिमान हॉकर्स युनियन यांचेकडुन हॉकर्स विरोधी अतिक्रमण कारवाईकीचा दोन दिवसाआधी जाहीर निषेध करुन भरपावसात आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाला मनपाने कोणतीही दाद न देता पोटाची खळगी भरणाऱ्या हॉकर्स धारकांवर मनपाने मनमानी अतिक्रमणाची कारवाई सुरुच ठेवली. त्यामुळे मनपाची अशी अन्यायकारक सुरु असलेली मोहिम ही शहर फेरीवाला धोरण २०१४ या कायद्याचे उल्लंघन करीत आहे. तसेच या कायद्यांतर्गत हॉकर्स विरोधी कुठलीही कारवाई करायचा अगोदर टाऊन वेल्डिंग कमिटीची मीटिंग घेतल्याशिवाय कारवाई करता येत नाही. परंतु अद्यापही अमरावती महानगरपालिकेने टाऊन वेल्डिंग कमिटीची मीटिंग घेतलेली नाही. परस्पर आदेश काढून हॉकर्स विरुद्ध



अतिक्रमणाची कारवाई सुरू केली. त्यामुळे युवा स्वाभिमान पार्टीचे हॉकर्स युनियन अध्यक्ष गणेश मारोडकर टाऊन वेल्डिंग कमिटी मेंबर यांच्या नेतृत्वात अमरावती गाडगेबाबा समाधी मंदिराजवळ शेकडो हॉकर्स धारकांसोबत नागपंचमीचा सण साजरा न करता आपल्या कुटुंबाच्या रोजीरोटीसाठी नागपंचमी सारख्या सणाच्या दिवशीच मीठभाकरीचे आंदोलन करण्यात आले.

विशेष म्हणजे अमरावती शहरामध्ये अनेक असे हॉटेल्स व मॉल असुन त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची पार्कींगची व्यवस्था नसल्याने वाहतुकीला खोळंबा निर्माण होवून नागरिकांना अतोनत त्रास सहन करावा लागतो तरी सुद्धा अशा मॉल व हॉटेल्सवर कारवाई न करता आमच्यासारख्या कुटुंबासाठी दोन वेळची रोजीरोटी कमावणाऱ्या हॉकर्स धारकांवर मनमानी करुन अतिक्रमणाची कारवाई करत आहे हा सरळ सरळ हॉकर्स धारक व त्यांच्या कुटुंबावर अन्याय होत असल्याचे युवा स्वाभिमान हॉकर्स युनियन अध्यक्ष गणेश मारोडकर यांनी सांगितले या अतिक्रमाणाच्या कारवाईमुळे सर्व हॉकर्सधारकांचे व्यवसाय बुडाले असुन मनपाने हॉकर्स धारकांच्या गाड्या सुद्धा तोडण्यात आल्या. आधी मॉल व हॉटेल्सचे पार्कींग व्यवस्थित करा व नंतरच आमच्यावर कारवाई करा अशा इशारा सुद्धा हॉकर्स युनियनच्या वतीने गणेश मारोडकर यांनी दिला. जर या नंतरही हॉकर्सवर होणारी अतिक्रमणाची कारवाई मनपाने थांबविली नाही तर याहीपेक्षा मिरचीभाकर खावून आंदोलन करुन संपुर्ण अमरावती शहरातील मोठमोठ्या हॉटेल्स व मॉलला मिरच्या लावण्याचा इशारा सुद्धा यावेळी गणेश मारोडकर यांनी दिला. तसेच हॉकर्स धारकांना योग्य ठिकाणी जागा व स्मार्ट कार्ड देऊन त्यांना व्यवसाय करु द्यावा असेसुद्धा यावेळी सांगितलेयावेळी गणेश मारोडकर, दिगंबर कोरडे, निलेश कोरडे, सारिकाताई राऊत, सुरज चढार, जावेद भाई, अभय रायेकवार, संदीप भुयार, कांताबाई, संगीताबाई शिरभाते, उमेश इंगोले, उमाबाई आमले, अंकुश तळकीत, आशिष ढोले, देवा आमले, राजा साहू, मोहन सदाफळे, रितेश पुरी, अक्षय पेढेकर, अंकुश तरकीत सह शेकडो हॉकर्स धारक उपस्थित होते.

# अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्याच्या अडचणीत वाढ?

## जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशी समितीच्या अंतिम अहवालाची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दादाराव डोलारकर यांच्या कारकिर्दीत शहरातील केलेल्या विकासकामात अनियमितता केल्याची तक्रार प्रहार संघटननेचे शंभू मालठाणे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी समिती गठीत करून शहरातील झालेल्या कामांची चौकशी करण्यात आली होती त्यात अनेक त्रुटी चौकशी समितीला आढळून आल्या असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दादाराव डोलारकर यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. मुख्याधिकारी दादाराव



डोलारकर यांनी कारणे दाखवा नोटीसचा खुलासा सादर केला असून आता जिल्हाधिकाऱ्यांच्या चौकशीचा अंतिम अहवाल येणार असल्याने या अहवालात मुख्याधिकारी दादाराव डोल्हारकर यांच्यावर कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबाबत अधिक माहिती अशी की अंजनगाव सुर्जी नगरपरिषद अंतर्गत शहरात अनेक विकास कामे सुरू असुन मर्जीतील कंत्राटदारांना मॅनेज करून कामे देण्यात आल्याने निकृष्ट दर्जाची होत असल्याच्या अनेक तक्रारी होऊन स्थानिक नगरपरिषद प्रशासनाने कोणत्याही प्रकारची तक्रारींची दखल न घेतल्याने प्रहार संघटनेने पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईलने आंदोलन केले होते.

# तळेगाव ठाकूर येथे नागपंचमी निमित्त पारंपरिक वारूळ पूजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९तिवसा**

तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर या गावात श्रावण महिन्यातील पवित्र नागपंचमीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. गावातील काही वयोवृद्ध आणि ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते गावाजवळील वारूळावर विधिवत पूजन करण्यात आले. पूजनाच्या वेळी नागराजाची पारंपरिक मंत्रोच्चारांसह आरती करण्यात आली.या दिवशी गावातील मजूर, शेतकरी आणि घरातील स्त्रिया सर्वांनी आपापली कामे थांबवून, आनंदाने




नागपूजनात सहभाग घेतला. गावकऱ्यांनी नागदेवतेस दूध, फुले, फळे अर्पण करून वर्षभर भरपूर पाऊस, पीकवाढ आणि संकटापासून संरक्षण यासाठी प्रार्थना केली.नागपंचमीच्या दिवशी विशेष करून कोणतेही खोदकाम केले जात नाही, ही परंपरा आजही गावकरी श्रद्धेने जपत आहेत. या दिवशी शेतकरी आपल्या शेतातील नागदेवतेच्या वसतीस्थानी फुलांची सजावट करतात आणि पूजन करून नमन करतात.या कार्यक्रमामुळे गावात एकत्रितपणाची भावना वाढीस लागते आणि जुनी परंपरा, श्रद्धा आणि संस्कृतीचे जतन होते, असे मत गावातील ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केले. नागपंचमी हा सण केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून निसर्गाशी नाते जपण्याचा एक सुंदर पुरातन संदेश देणारा दिवस आहे, असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.

# जळगाव आर्वीत नागपंचमीला येथे चालतो दोन दिवस अखंड उपवास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९धा. रेल्वे**

येथून जवळच असलेल्या जळगाव आर्वी गावामध्ये नागपंचमीला वेगळीच प्रथा पाहायला मिळते. याठिकाणी प्रत्येकाला दोन दिवस उपवास, तव्याचा वापर वर्ज्य, केवळ फुटाण्यांचा वापर करत बाऱ्याची रेलचेल असा प्रकार पाहायला मिळतो. अनेक वर्षापासून येथे ही परंपरा गावकरी पाळतात.



जळगाव आर्वी हे गाव परीक्षित बाबांच्या नावाने विदर्भात ओळखले जाते. नागपंचमीच्या पाच दिवस आधीपासून गावातील शेतशिवाराची कामे बंद केली जातात. शिवाजी महाराजांच्या दुतावासाचे गाव म्हणून हे गाव परिचित आहे. त्याकाळी मोगलांनी गावावर वारंवार हल्ले करून है वसलेले गाव अनेकदा उद्ध्वस्त केले होते. त्यानंतर हे गाव काही अंतरावर वसवण्यात आले. तपश्चर्या करणाऱ्या एका ऋर्षीच्या गळ्यात परीक्षित राजाने मृत साप टाकला. त्यावेळी या मुनींनी राजाला शाप दिल्याने परीक्षित राजाचा मृत्यू अटळ होता. अशावेळी राजाने अकरा दिवस या मंदिरात नागराजाची पूजाअर्चा केली. त्यामुळे त्यांना जीवनदान मिळाले, अशी आख्यायिका आहे. सन अठराशे पूर्वी परीक्षित बाबांच्या मंदिरांची स्थापना पोलिस पाटील परसराम भोगे, शेषराव भोगे, दिगंबर भोगे यांनी केल्याची इतिहासात नोंद आहे.

### जिल्हाभरातील भाविक येतात दर्शनासाठी

जळगाव आर्वीतील ग्रामस्थांनी येथे मोठे मंदिर बांधले आहे. नागपंचमीच्या कालावधीत ग्रामस्थ तीन दिवस परीक्षित बाबांची आराधना करतात. या मंदिरात नागपंचमीचे गीत युवक गातात. नागपंचमीला जिल्ह्यातील भाविक येथे दर्शनासाठी गर्दी करतील. संपूर्ण वर्षभर शेतीचे व गावाचे रक्षण परीक्षित बाबा करत असल्याची श्रद्धा येथील गावकऱ्यांची आहे.

# स्वतंत्र विदर्भ राज्यासाठी ९ तारखेला 'निदर्शन आंदोलन' - वामनराव चटप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

विदर्भांचे स्वतंत्र राज्य यथाशीघ्रमिळविण्याच्या दृष्टीने देशातील स्वातंत्र्याच्या लढाईतील घटनेच्या आधारे ९ ऑगस्ट दुपारी १२ ते ४ वाजतापर्यंत नागपूर येथील संविधान चौकात 'निदर्शन आंदोलन केले जाणार असल्याची माहिती माहिती विदर्भ राज्य आंदोलन समितीचे आध्यक्ष माजी आमदार ॲड. वामनराव चटप यांनी दिली.

ॲड. चटप यांनी, घटनेतील आर्टिकल-३ प्रमाणे विदर्भाचे स्वतंत्र राज्य तत्काळ निर्माण करावे, यासाठी आंदोलन तीव्र करण्याच्या हेतूने महाराष्ट्रवादी और विदर्भ विरोधी चले जाओ या आंदोलनाचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र सरकारची दिवाळखोरीकडे




वाटचाल सुरु असून, राज्याचे महसुली उत्पन्न पाच लाख ६० हजार ९६३ कोटी असून, ३१ मार्चपर्यंत राज्यावर कर्जाचा डोंगर होता. सात लाख ८२ हजार कोटी व त्या कर्जातर ध्यावे लागणाऱ्या कर्जाचा बोजा होता. ५६ हजार ७२७ हजार कोटी सरकारने बजेट मंजुरीनंतर घेतलेल्या कर्जाची राशी ही १३ हजार कोटी असून, भविष्यातीलआर्थिक गरजा राज्याच्या भगतिप्याकरिता केंद्र सरकारला एक लाख ३२ हजार कोटी रुपयांचे परत कर्ज घेण्यास परवानगी मागितली आहे. ३०सप्टेंबरपर्यंत राज्य सरकारवरील कर्जाचा डोंगर व व्याजाचा बोजा एकूण नऊ लाख ८३ हजार ७८७ कोटी रुपये होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकार विदर्भाचा ६० हजार कोटी रुपयांचा सिंचनाचा अनुशेष व सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, उद्योग, ऊर्जा, रस्ते ग्रामविकास आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभागाचा १७हजार कोटी रुपयांचा अनुशेष, असा एकूण ७५ हजार कोटी रुपयांचा निधी देऊन विदर्भाचा अनुशेष भरून काढण्यात असमर्थ आहे. त्यामुळे विदर्भाची सिंधान क्षमता कदापी वाढू शकत नाही.परिणामी शेतकऱ्याच्या आत्महत्याचे सुरू असलेले सत्र थांबू शकत नाही असेही चटप म्हणालेत.

# हुमणी अळीच्या प्रादुर्भावामुळे शेतकरी चिंतेत; कृषी विभागाचे शास्त्रज्ञ शेतावर धावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९वाठोडा शुकलेशवर**

भातकुली तालुक्यातील मौजे पूर्णानगर परिसरात सोयाबीन पिकावर हुमणी अळीचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या '३० कलमी कार्यक्रम' अंतर्गत शेतकऱ्यांना हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी त्वरित मार्गदर्शन करण्यात आले.

अमरावती येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र येथील शास्त्रज्ञ आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे शेतावर भेट दिली. उपविभागीय कृषी अधिकारी श्री.



पंकज चेडे यांच्या नेतृत्वाखाली निरीक्षण करण्यात आले. शेतकऱ्यांना अळीच्या प्रादुर्भावाचे गांभीर्य लक्षात घेऊन उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले.आरसीसीचे शास्त्रज्ञ श्री. राजीव धावडे यांनी अळीच्या नियंत्रणासाठी जैविक उपाय म्हणून मेटारायझीम ४ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून आळवणी करण्याचा सल्ला दिला. तसेच, अळीचे प्रमाण आणि नुकसानीची पातळी पाहून रासायनिक कीटकनाशकांचा वापर करण्याचा सल्लाही देण्यात आला. यामध्ये फिप्रोनील ४०% + इमिडाक्लोरोफिड ४०% मिश्रणाचे ५ मि.ली. प्रति लिटर पाण्यात मिसळून खोडाजवळ आळवणी करावी, असे मार्गदर्शन करण्यात आले.या निरीक्षण दौऱ्यात मा. डॉ. प्रवीण पाटील (सोयाबीन ब्रिडर, RRC अमरावती), श्री. जी.एस. मिसाळ (महाबीज, अमरावती), श्री. सागर इंगोले (तालुका कृषी अधिकारी, भातकुली) यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते. श्री. प्रमोद खर्चान व श्री. घाडगे (म.कृ.अ. टाकरखेडा), श्रीमती शितल वानखडे व श्रीमती ऋणाली पाटकर (सा.कृ.अ.), तसेच उपसरपंच श्री. उमेश महिंगे आणि गावातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कृषी विभागाच्या या तत्परतेमुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, वेळेत मार्गदर्शन मिळाल्यामुळे नुकसान टाळता येईल, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला.